ग्रं. सं. ठाणे
निवडी

# पाडव्याची भेट



## गृह आणि गृहस्थ

लेखक व प्रकाशकः—
विंद रंगराव अंळकर
वी शुक्रवारी, नागपूर.

REFBK-0002465

चैत्र शुद्ध १ शके १८४६ संवत १९८०
रोज शनिवार तारीख ५ एप्रिल १९२४

किम्मत आठ आणे.

REFBK-0002465

॥ श्री ॥

क्र. २४६५

## प्रस्तावना.

झालें. आजपर्यंत आठ लेख लिहिले, आज नववें लेख लिहिण्याचा सुप्रसंग आला. प्रत्येक लेखांत जे विचार सांगितले त्यांच्या पूर्वीच्या असलेल्या वर्णनांत आणि वाढीमुळें आज दिसत असणाऱ्या वर्णनांत अंतर असल्यामुळें असें विचार सांगत असताना त्यांना पुस्तकी पाठांतर दृष्टीनें जें नाविन्य आल्यासारखें दिसलें तें कांहीं मंडळींना आणि पोपटपंचींना जरी कसेसेंच वाटेल तरी सुज्ञ मंडळींना वाढीमुळें अंतर कसें पडतें हें पूर्णपणें माहीत असल्यामुळें त्यांनीं प्रत्येक लेखाच्या वेळीं मधुर हास्य करून प्रोत्साहन दिलें इतकेंच नाहीं तर जें सहाय करावयाचें तेंहि त्यांनीं आनंदानें केलें आणि लोभाचीच वृद्धि केली.

लोभच तो. लोभ मोजावयाला जावें तर तो मोजतां येत नाहीं पण स्मरण झालें कीं गहिंवरून येतें. ईश्वर प्रसन्न झाला तर तो काय न करील ? त्याचप्रमाणें ईश्वर स्वरूपी असलेली सुज्ञ मंडळी प्रसन्न झाली तर ते काय न करतील ? ईश्वराचें करणें ईश्वराप्रमाणेंच साधारण मनुष्यांच्या चर्मचक्षुला अदृश्य जरी असलें तरी जगांत वावरणारी सुज्ञमंडळी दृश्य असल्यामुळें त्यांची कृपाहि दृश्यच असतें आणि कोणत्या सुज्ञ मंडळींनीं कशी कृपा केली हेंहि प्रत्यक्ष दाखवितां येतें. सुज्ञ मंडळी जगांत आहेत ह्मणूनच जगांत टिकावहि लागतो. नाहींतर कोणीं कोणाला जगांत विचारलेंच नसतें. जग रजोगुणी असल्यामुळें जग म्हणजे नुसता मायावी लक्ष्मीचा बाजार आहे. आणि म्हणूनच जगांत जिकडें जावें तिकडें मायावी बाजाराप्रमाणेंच रेटारेटीहि आहेच. असें असलें तरी ज्याप्रमाणें बाजारांत रेटारेटी करूनच आपला बाजार उरकवून घ्यावा लागतो त्याचप्रमाणें जगांतहि जगांत वावरणाऱ्यांना आपलेहि व्यवहार रेटारेटी करूनच उरकवून घ्यावे लागतात. दुकानदारांनीं कितीहि इमानदारी दाखवून शपथा आहणा घेतल्या तरी त्यांच्या तराजूंकडें लक्ष

देऊन जसें भाव ठरविण्यांत चिकित्सा करावी लागते त्याचप्रमाणें जगांतहि वावरताना फारच सावध राहावें लागतें. असें जर न केलें तर बाजारांत गर्दी पाहूनच बिचकणाऱ्या भिऱ्या मनुष्याला दिवसभर इकडून तिकडें कितीहि फिरले तरी शेवटीं कांहीं एक न मिळतां त्याचें फिरणें व्यर्थ भटकणें मात्र होतें आणि बाजाराकरितां कंबरेस खोंचून आणलेली माया कंबरेसच राहते आणि कधीं कधीं तेथें होणाऱ्या धक्काबुक्कीमुळें जर घाबरगुंडी झाली तर कंबरेस असेलली माया गळूनहि पडते अथवा कंबरेच्या ऐवजी खिशांत पिशवी ठेविली असली तरी ती हरवून जाते त्याचप्रमाणें जगांतहि गर्दी पाहूनच बिचकणाऱ्या भिऱ्या मनुष्याला कांहीं एक करतां येणें शक्य नसल्यामुळें इकडून तिकडें व्यर्थ भटकावें मात्र लागतें आणि जवळ असलेली मायाहि तो घाबरगुंडीमुळें गमावून बसतो. म्हणून जगांत जर वावरावयाचें आहे तर रेटारेटी करूनच सावधगीरीनें मार्ग काढून आपले व्यवहार उरकवून घ्यावे लागतात. बाजार जर चांगला झाला तर ज्याप्रमाणें घरांतील चांगलीं माणसें त्याबद्दल जसें प्रोत्साहन देतात त्याचप्रमाणें जगांतहि चांगलीं कर्में घडलीं तर अशीं कर्में कर-

पाऱ्यांनांहि सुज्ञ मंडळीहि प्रोत्साहन दिल्याशिवाय राहात नाहींत. मग भीति कसली? आणि जगांत वावरतांना जे विचार मनांत येतात ते मन मोकळें करून सुज्ञ मंडळी पुढें ठेविल्या शिवाय कसें राहवेल? आणि मनांतले विचार मनांतच दाबून तरी कां ठेवावे? म्हणूनच सुज्ञ मंडळीकडे लक्ष जातें. मनुष्य कितीहि रोगग्रस्त असला तरी दिवसभर त्याची जी प्रकृति असते त्या प्रकृतीच्या मानानें रोज सकाळीं त्याची प्रकृति थोडी तरी बरीच असते अथवा दुधांत कितीहि पाणी मिसळलेलें असलें तरी हें दुध सुद्धां सणावाराचे दिवशीं दुध म्हणूनच खपतें आणि त्याबद्दल जसा तंटा नसतो, त्याचप्रमाणें वर्षारंभीं प्रतिपदेच्या दिवशीं पूर्वी मनुष्य कोणत्याहि स्थितींत असला तरी त्या स्थितीच्या मानानें तो ज्यास्त प्रफुल्लितच असतो अथवा दुधाप्रमाणें तो सुज्ञ म्हणूनच समजला जाणें साहजिक असतें. असें जरी सर्व मंडळी वर्षारंभीं सुज्ञ असली तरी वर्षभर जे सारखे टिकून राहतात तेच सुज्ञ मंडळी जगांत धन्य असतात आणि त्यांच्या योगानेंच जगहि वाढीस लागलेलें आहे. ईश्वराच्या सात्विकगुणा बरोबरच ईश्वरानें अंगाखालीं दाबून ठेऊन ज्यावर शयन केलें आहे अशा विषारी दुतोंडी शेषाचा तमो-

गुण आणि जिला सेवा करावयास लाविलें आहे अशा मायावी लक्ष्मीचा रजोगुणहि ईश्वरापासून झालेल्या मनुष्यांत असल्यामुळें मनुष्य रूपांत सत्व, रज आणि तम हे तिन्ही गुण आहेतच आणि हे गुण जगांत वावरण्याकरितां ज्या प्रमाणांत पाहिजेत त्या प्रमाणांत जे अंगीं वाळगतात तेच जगांत उत्तम रीतीनें वावरू शकतात आणि त्यांना जे वळण लावितात तेच जगांत सुज्ञ मंडळी असतात. सुज्ञ मंडळी जगांत आहेत ह्मणूनच सात्विक गुणाचें च वाढ करून जगाला मिथ्या ठरविणाऱ्या साधूंना जगाशीं ते फटकून वागत असल्यामुळेंहि जगाला जंगल करतां आला नाहीं आणि तमोगुणाचीच वाढ करणाऱ्या भोंदूंनाहि जगांत घोंटाळा उडवून जगाची राखरांगोळीहि करतां आली नाहीं आणि रजोगुणाचीच वाढ करून जगालाच चिटकून बसणाऱ्यांना घरघुनेहि होतां आले नाहीं. सुज्ञ मंडळीच्या सहवासानें साधुंची जेव्हां ओळख पटते आणि भोंदूंच्या झांपडींतून बचाव करून घेतां येतो तेव्हां जगांत घरघुसे न होतां घराची मर्यादा ज्या मानानें वाढवितां येते त्या मानानेंच परमार्थ घडत जातो आणि हें ईश्वरालाहि रुजूं असतें. मुळापासून स्वार्थत्याग करणारे साधू जगाशीं फटकून वाग-

तात म्हणूनच त्यांना जगांत वावरणारे पराकियासारखें असल्यामुळें त्यांचा स्वार्थत्याग परोपकार होतो आणि त्यायोगेंच परोपकाराच्या नांवाखालीं जे पुन्हां जगांत वावरतात आणि आपली तुंबडी भरून घेतात त्यांचा भोंदूपणा उघडकीस आणण्याकरितांहि साधूचाच उपयोग होतो. साधूंच्या आशीर्वादानें जगांत वावरणाऱ्यांना भोंदूचा डाव समजून ते जेव्हां सावध होतात तेव्हां त्यांना परोपकाराच्या भरंवशावर राहून आयते बिळावर नागोबा होऊन बसण्याचें ध्येय भोंदू सारखें ठेवणें जगांत निचपणाचें वाटतें. म्हणूनच परोपकार करणारे साधु आणि परमार्थ करावयास सांगणारे सुज्ञ मंडळी अथवा संत जगाला तारणारे असल्या मुळें जगांत वावरणारे जेव्हां साधूंना घरीं आणतात आणि जगांत वावरणाऱ्या संताचें जगांतच असल्यामुळें घरीं जेव्हां आगमन होतें तेव्हां असे प्रसंग जगांत वावरणाऱ्यांना दिवाळी आणि दसऱ्या सारखें उत्सवाचें वाटतात. अशा प्रसंगीं परमार्थ घडवून आणणारा स्वार्थत्याग हि सर्वांना सुखकर होतो आणि त्यांना जगांत वावरतांना स्वार्थ संपादीत संपादीतच स्वार्थ त्यागहि करतां येतो. आणि जगांत आळस उत्पन्न करून इतरांच्या तोंडाकडे पाहावयास लावणारी परोपकाराची

अपेक्षा ज्या भोंदूकडून वाखाणली जाते त्या भोंदूपासून जे दूर राहतात तेंच जगाला वाढीस लावतात. म्हणूनच जगांत साधूंची आणि भोंदूंची जर ओळख करून देण्यास कोणी समर्थ असतील तर ते जगांत वावरणाऱ्या सुज्ञ मंडळी सारख्या संताशिवाय इतर कोण असू शकणार ? आणि जगांत कर्मयोग श्रेष्ठ असल्यामुळें कर्म योगाचें रहस्य सांगून जगांत वावरणाऱ्या लोकांत जागृति उत्पन्न करणारे संत लोकमान्य झाल्याशिवाय कसें राहणार ? विश्वमान्य असणारे साधु भोंदूंची ओळख करून देण्यास फारच उपयोगी पडतात म्हणून त्यांचा आशीर्वाद श्रेष्ठ जरी असला तरी जगांत कर्मयोग श्रेष्ठ आहे म्हणूनच भगवंताचेंहि अवतार जगांतच झाले आणि भगवान श्रीकृष्णानें विश्वमान्य असलेल्या साधूंचा आशीर्वाद घेत घेत जगांत शेवटीं कर्मयोग श्रेष्ठ आहे हे जें सांगीतले तें भगवत्‌गीते वरून सिद्धच होत आहे. म्हणून जगांत कर्मयोग श्रेष्ठ आहे आणि त्याची जाणीव ज्यांना होते ते इतरांकडे पाहून हळहळत न बसतां प्राप्त झालेली स्थिति आपल्याच पूर्व कर्मानुरूप आहे हें जाणून पुढें जी स्थिति प्राप्त करून घ्यावयाची इच्छा असेल ती स्थिति

प्राप्त करून घेण्याकरितां जीं कर्में करावीं लागतात तीं कर्में करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते तेव्हां कर्मयोगाचें रहस्य समजतें आणि त्याला कारण जगांत वावरणारे सुज्ञ मंडळी असल्यामुळें सुज्ञ मंडळी ईश्वरस्वरूपी आहेत इतकेंच नाहीं तर त्यांच्यांत जो श्रेष्ठ असेल तो मग साक्षात ईश्वराचा अवतारहि ठरल्या शिवाय कसा राहणार ! आणि इतर त्याचीच लेंकरें असल्यामुळें हीं सर्वच सुज्ञ मंडळी जगांत संत ठरल्या शिवायहि कशी राहणार ? आणि विश्वमान्य असलेल्या साधूंनीं जगाला जरी मिथ्या ठरवून जगाशीं संबंध सोडला तरी जगांतच जग मिथ्या कसें ठरणार ! जगांत वावरणाऱ्यांना जग सत्य आहे हें खास. कारण स्वप्नांत मनुष्याला अग्नींत होरपळलेलें जरी वाटलें तरी त्याला दुःख होत नाहीं परंतु जगांत वावरतांना जर बोटाला थोडीशी अग्नीची ज्योत लागून चटका बसला तर त्या ठिकाणीं लागलीच फोड येऊन दुःख होतें. म्हणून जगांत राहणें स्वप्नासारखें नाहीं आणि जग नाटकासारखेंहि नाहीं. कारण नाटकांत मारलेला चाबूक अंगाला लागत नाहीं परंतु जगांत लागणारा चाबूक अंगावर वळच आणून दुःख देतो. स्वप्नांत भास होतो आणि नाटक करमणूकीकरितां असतें

ह्मणून सोंग असतें. जगांत तसें नाहीं ह्मणूनच जग सत्य आहे आणि जगाची जी वाढ होते ती प्रत्यक्ष दिसते आणि भोगावी लागते. जगांत कोठेहि गेलें तरी जगाला वाढीस लावणारे सुज्ञ मंडळी दिसल्या शिवाय राहत नाहींत. अशा प्रकारें सुज्ञ मंडळी सर्व ठिकाणीं असल्यामुळें हिंदुस्थानांतहि ते आहेतच आणि हिंदुस्थान मुळभुमि असल्यामुळें त्या ठिकाणीं सुज्ञ मंडळी सारख्या संताचा बहुमानहि होतोच आहे. पृथ्वी जेव्हां प्रथम उघडकीस आली तेव्हां पृथ्वीवर सर्वांत उंच असलेला पृथ्वीचा भाग प्रथम दृष्टोत्पत्तीस पडणें साहाजिक असल्यामुळें हिंदुस्थानांत असलेलाच हिमालयाचा उंच भाग प्रथम दृष्टोत्पत्तीस पडणें साहजिक आहे आणि त्या ठिकाणींच मनुष्यरूप धारण करणारे जीवहि प्रथम दृष्टोत्पत्तीस पडणें साहाजिकच आहे. जो पर्यंत पृथ्वीवर हिमालयापेक्षां जास्त उंच पृथ्वीचा भाग इतर कोठेंहि दिसत नाहीं तों पर्यंत हिंदुस्थानाला मूळभुमि नाहीं असें कोणी म्हणेल असें वाटत नाहीं. आज म्हणविल्या जाणाऱ्या हिमालयाला पूर्वी म्हणविला जाणारा मेरू पर्वत म्हणून तेंच पुर्वी म्हणाविलें जाणारे आर्यावर्त आणि त्या ठिकाणीं वास्तव्य करणारे आर्यलोक जसे

जसें पृथ्वीच्या वाढी बरोबरच इतर ठिकाणीं पसरत चाललें तस तशी जगाची वाढ होऊन पूर्वी असलेलें हेंच आर्यावर्त आज हिंदुस्थान म्हणविला जाणें साहजिकच आहे. अशा प्रकारें पूर्वी असलेलें आर्यांचें आर्यावर्त आज वाढीस लागून तें हिंदुस्थान म्हणविलें जाऊन त्या ठिकाणीं राहणारे हिंदु म्हणविले जाणें ओघानेंच आलेलें आहे. आर्य आणि आर्यावर्त ही संस्कृत नांवें असून त्यांचीं प्राकृत नांवें हिंदु आणि हिंदुस्थान जरी झालेलीं असलीं तरी असें म्हणणें रजोगुणाला सोडून नाहीं. जग रजोगुणी असल्यामुळें जगांत लक्ष्मीचा प्रभाव आहे आणि जगांत लक्ष्मीचें तेज चंद्रप्रकाशानें प्रफुल्लित होत असल्यामुळें जगावर राज्य करणाऱ्यांना इंद्र म्हणून इतरांना इंदू म्हणणें रजोगुणाला धरून आहे. पश्चिमेच्या बाजूला पाण्याचा प्रवाह हिमालयापासून आणून आर्यावर्ताची सीमा ज्या इंदुनें आंखली त्या इंदूच्या नांवानें तो प्रवाह सीमा आखल्यामुळें सिंदू म्हणविला जाणें आणि त्या सिंदूच्या आसपास असलेला भाग सिंदप्रांत म्हणविला जाणें साहाजिकच आहे. आणि आर्य असलेले इंदु हिमालयावरून आलेले असल्या-

मुळें त्यांना हिंदु ह्मणून ज्या आर्यावर्तावर ते पसरले त्या भागाला पुढें हिंदुस्थान ह्मणणेंहि ओघानेंच आलें. अशाप्रकारें हिंदुस्थान इंदुप्रकाशानें चमकत असल्यामुळें रजोगुणी जगांत हिंदुस्थान सोन्याची चिमणी वाटून हिंदुस्थानाकडे सर्वांचें लक्ष लागणें नैसर्गिकच आहे आणि त्याठिकाणीं सर्व नैसर्गिक प्रकारहि सनातन राहणें साहजिकच आहे. ह्मणून मूळ भूमि असलेल्या हिंदुस्थानांत नैसर्गिक धर्म आणि नैसर्गिक जाति सर्व प्रकारांत असल्यामुळें मनुष्य रूपांतहि त्या आहेत आणि त्यायोगें हिंदुधर्मांत नैसर्गिक जाति सनातन असल्यामुळें जन्म आणि मृत्यु ज्या नैसर्गिक शक्तीच्या स्वाधीन आहेत त्याच शक्तीच्या स्वाधीन हिंदुधर्माची आणि त्या धर्मातील जातींचीहि वाढ करणें आहे. ह्मणून नैसर्गिक प्राप्त होणाऱ्या जाति हिंदुधर्मांत सनातन असून जन्मसिद्ध हक्क देणाऱ्या असल्यामुळें कृत्रिम धर्माची मात्रा त्या ठिकाणीं चालणें शक्य नाहीं. अशाप्रकारें नैसर्गिक असलेल्या हिंदुधर्मांत जाति नैसर्गिक असल्यामुळें त्या जाति पुर्वी जशा होत्या तशाच त्या आजहि नैसर्गिकच आहेत आणि त्यांची वाढ होऊन त्या धर्माला फोंफावलेल्या वृक्षाप्रमाणें प्रफुल्लितपणाच आलेला

आहे आणि पुढेंहि येत राहणार यांत संशय नाहीं. वृक्षाला फुटलेल्या वांकड्या तिकड्या फांद्या छाटल्या म्हणजे त्यावेळीं तो वृक्ष जरी प्रथम रोडावलेला दिसतो तरी छाटल्यामुळें तो पुढें जेव्हां वाढून फोंफावत जातो तेव्हां त्यायोगें त्याला ज्याप्रमाणें प्रफुल्लितपणा येतो त्याचप्रमाणे नैसर्गिक धर्महि छाटछाटीमुळें जरी कांहीं वेळ रोडावलेला दिसतो तरी त्याचें हें रोडावणें वाढीस लागणारें असून त्याला प्रफुल्लितपणाच आणणारें असतें आणि छाटाछाटीमुळें त्यांत असलेला वांकडेपणाहि वेगळा होऊन जातो. नैसर्गिक धर्मांतून अशा छाटलेल्यांचा जर समाज झाला आणि तो वाढून मोठा झाला तर त्याला जेव्हां धर्मप्रमाणें मान्यता मिळते तेव्हां अशा कृत्रीम धर्मांत नैसर्गिकपणा नसल्यामुळें अशा धर्माची वाढ करणें मनुष्यांच्या स्वाधीन असतें आणि वाढ करण्याकरितां कृत्रीम उपाय योजिल्याशिवाय गत्यंतर नसल्यामुळें त्यांना वाटतील तितक्या खटपटी कराव्या लागतात आणि नैसर्गिक धर्मांतील लोकांना भ्रष्ट करण्याकरितां त्यांना बऱ्याच सवलतीहि ठेवाव्या लागतात. असें असलें तरी कृत्रीम धर्माला मोहून जाऊन जे धर्मांतर करतात त्यांना जर नैसर्गिक धर्म आणि जाति यांनीं अजिबात

सोडले नाहीं तर धर्मांतर न करितां नैसर्गिक धर्मातच राहून अष्टपणा कालविणाऱ्यांचा नैसर्गिक जातिचा मूळ गुण अजिबात कसा नाहींसा होणार? कृत्रीमपणामुळें वरपांगीं कितीहि फरक दिसला तरी पिंडांत असलेला नैसर्गिकपणा कधींहि जात नाहीं, हें खास. एखाद्या पुरुषानें कृत्रीम स्त्रीवेश धारण करून स्त्रियांना जरी लाजविलें आणि त्यांच्यावर ताण केली तरी नैसर्गिक असलेलें पुरुषत्व जसें कायम राहतें त्याच प्रमाणें कृत्रीम धर्मात जे धर्मांतर करतात त्यांचाहि नैसर्गिक धर्म कायमच राहतो. ह्मणून कृत्रीम धर्माला नेहमी भीति असते आणि नैसर्गिक धर्माला कधींहि भीति नसते. ज्या शक्तीच्या स्वाधीन जन्म आणि मृत्यु आहे त्या नैसर्गिक शक्तीच्या स्वाधीन लोकसंखेची वाढ करणें असल्यामुळें एका पुरुषापासून वंशविस्तार होऊन घर जसें कधीं कधीं भरलेलें दिसतें आणि एकाचे एकवीस होतात त्याचप्रमाणें भरलेल्या घरांत दिवा लावयास सुद्धां कधीं कधीं कोणीहि राहत नाहीं हें लक्षांत आलें म्हणजे लोकसंखेवरूनच धर्माच्या वाढीचें प्रमाण ठरविणें बरोबर होत नाहीं. एखाद्याला पांच मुलें झालीं म्हणून त्या पांचापासून पंचवीस होतील

हें गणीत शास्त्रानें बरोबर असलें तरी नैसर्गिक शास्त्र दृष्टया हें बरोबर ठरत नाहीं. मग नैसर्गिक धर्माची वाढ करणें कृत्रीम धर्माप्रमाणें मनुष्याच्या हातांत कशी राहणार? असें असल्यामुळें नैसर्गिक धर्मांत कमी लोकसंख्या झालेली जर दिसली आणि कृत्रीम धर्मांत जर वाढलेली दिसली तर त्या बद्दल भीति वाटण्याचें कारण राहत नाहीं. कारण एकाचे एकवीस करणारी आणि भरलेल्या घराला उजाड करणारी जी शक्ती आहे ती मनुष्याची नाहीं हें कोणाच्यानेंहि नाकबूल करवेल असें वाटत नाहीं. म्हणून धर्माचें बळ लोकसंखेवर नसून नैसर्गिक शक्तीवर आहे आणि त्यामुळेंच नैसर्गिक धर्माला आणि त्यातील नैसर्गिक जातीला कितीहि संकटें आलीं आणि कृत्रीम धर्मानें जोर केला तरी भीति वाटत नाहीं. परंतु नैसर्गिक धर्मानें जर थोडी ढील दिली तर कृत्रीम धर्माची मात्र कशी गाळण उडते! हें पाहिलें म्हणजे ज्यास्त भीति कोणाला आहे हें लक्षांत आल्यावाचून राहत नाहीं. असें प्रकार आहेत म्हणूनच नैसर्गिक धर्माची वाढ करण्याकरितां कोणालाहि बाटवावयाचें नसतें. परंतु कृत्रीम धर्माला मात्र नैसर्गिक धर्मातील लोकांना बाटवि-

त्याशिवाय गत्यंतरच नसतें. आणि असें करण्याकरितां कृत्रीम धर्मांतील लोकांचें लक्ष जर नैसर्गिक धर्मांत असलेल्या अमंगळ जातीकडें लागलें तर नैसर्गिक धर्मांत अमंगळ जातीला असलेली अस्पृश्यता कृत्रीम धर्मांत मानून कसें चालणार! आणि त्यायोगें त्या धर्माचीहि वाढ कशी होणार? आणि अस्पृश्यता जर मानली तर मग अशा कृत्रीम धर्माला विचारणार तरी कोण? असें असलें तरी कृत्रीम धर्मांतहि अमंगळ कर्में करावीं लागत असल्यामुळें तशीं कर्में शिक्षा म्हणून ज्यांच्याकडून करविलीं जातात त्यांना ते प्रकार तुरुंगातल्या शिक्षे-प्रमाणें वाटणें साहजिक असल्यामुळें कृत्रीम धर्म त्यांनाहि तुरुंगाप्रमाणें जर वाटला तर त्यांत नवल कसलें? आणि अमंगळ कर्में करण्याची ज्यांच्यावर शिक्षा म्हणून पाळी येते त्यांना अस्पृश्यता न मानल्यामुळें जर शिक्षा करताना वाटेल तो बडवूं लागला तर ही हालअपेष्टा भोगण्यापेक्षां अस्पृश्यता असणें बरें असें जर त्याना वाटलें तर त्यांतहि नवल कसलें! इतर प्रकाराप्रमाणें अमंगळ प्रकार नैसर्गिक असल्यामुळें इतर जाती प्रमाणें अमंगळ जातिहि नैसर्गीकच राहणार आणि अमंगळ कर्में करणाऱ्या जातींना नैसर्गिक

धर्मात अस्पृश्यता राहणारच आणि त्यांना अस्पृश्यता आहे म्हणून त्यांची शोभाहि आहेच. कारण त्यांनीं जर थोडे अडवून धरले तर काम करणें अडतें हें त्यांना माहीत नसेल ते जगाला जगणें नाहीत असेंच ह्मणणें भाग पडेल. असें असतांना ज्या नैसर्गिक धर्मांत अमंगळ कर्मे करणाऱ्यांना राजी ठेविण्याकरितां त्यांना खायप्यायाला देऊन कपडालत्ता द्यावा लागतो आणि अस्पृश्यतेमुळें त्यांच्या अंगावर कोणी हात सुद्धां टाकूं शकत नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांच्यावर हात टाकल्यानें उलट जर अंगावर हात पडला तर दुप्पट प्रायश्चित्त भोगावें लागतें त्या नैसर्गिक धर्माला वाटतील तशीं नांवें ठेवून कृत्रीम धर्मानुयायांनीं जरी आपला डाव साधला तरी कृत्रीम धर्मांत धर्मांतर केल्यानंतर त्यांना अंमगळ कर्मे शिक्षा म्हणून करणें जेव्हां भाग पडतें तेव्हां ती तुरुंगाप्रमाणें शिक्षा भोगत असतांना अशा मंडळींना अस्पृश्यता नसल्या बद्दलचाच आनंद वाटतो आणि त्यांना स्पृश्यतेचेंच कौतुक वाटतें असें कृत्रीम धर्मांतील इतर मंडळीसुद्धां म्हणतील असें वाटत नाहीं. अमंगळ कर्मे करणाऱ्यांना अस्पृश्यता असणें

जरुरींचें असल्यामुळें तो कलंक नाहीं, हें समजणें कठीण नाहीं. कारण जोंपर्यंत शौचास जाण्यासारखें अमंगळ कर्म पाहिजे आहे आणि प्रकृति चांगली ठेवण्या करितां मुद्दाम जुलाबाचें औषध द्यावें लागतें तों पर्यंत अशीं नैसर्गिक कर्मे अमंगळ असलीं तरी कलंक आहे असें वाटणें शक्य नाहीं. मग अशीं अमंगळ कर्मे केल्यानंतर स्वच्छ होई तों पर्यंत राहणार असलेली अस्पृश्यता कलंक आहे असें कसें वाटेल! आणि कांहींनीं चांगलीं कर्मे केलीं म्हणून सर्वांची अस्पृश्यता समूळ कशी नाहींशी होणार! आणि अमंगळ कर्मे केल्या नंतर स्वच्छ झाल्या शिवाय नुसत्या तोंडानें इतरांनीं अस्पृश्यता न मानण्यानेंच अमंगळपणा तरी कसा जाणार! चांगलीं कर्मे करणाऱ्यांची अस्पृश्यता जाते इतकेंच नाहीं तर त्यांचा आदर होतो आणि इतरांनाहि असलेली अस्पृश्यता बाजारासारख्या सार्वजनिक ठिकाणीं मानली जात नाहीं. म्हणून सर्वांचीच अस्पृश्यता सर्व ठिकाणीं समूळ नाहींशी झाली पाहिजे असें म्हणणें हिंदुस्थानसारख्या जगाच्या केंद्रस्थानीं तरी नैसर्गिक धर्म आणि नैसर्गिक जाति सनातन

असल्यामुळें कसें शक्य असणार? हिंदुस्थानांत नैसर्गिक धर्म आणि जाति राहणार इतकेंच नाहीं तर कृत्रीम धर्मांत सुद्धां जन्मसिद्ध हकालाच अस्सलपणाचा मान राहून धर्मांतर करणाऱ्यांचा मान दुय्यम प्रतीचा असतो हें प्रत्ययास येत नाहीं असें नाहीं. असें असलें आणि हिंदुस्थानांत असलेल्या नैसर्गिक हिंदुधर्मांत किती-हि जाति जन्मानुरूप असल्यामुळें वाढणें नैसर्गिक असलें आणि त्यामुळें काहीं काळापूर्वी असलेल्या चार जातिं वाढून त्याच्या पुढें अठरा जाति झाल्या आणि आज वाढत वाढत पुष्कळ जाति आणि पोटजाति झालेल्या असल्या तरी त्या सर्व जातींत ज्या प्रमाणें सुज्ञ मंडळी आहेत त्याच प्रमाणें कृत्रीम धर्मांत सुद्धां सुज्ञ मंडळी आहेत. हीं सर्व सुज्ञ मंडळी स्वधर्माचीच जाणीव ठेवणारे असल्यामुळें त्यांच्या सहवासानें जे विचार मनांत येतात ते स्वधर्मामुळें मुळापासुन स्वत्वाचीच जाणीव उत्पन्न करितात आणि अशी जाणीव झाली म्हणजे परधर्माकडें कधींहि लक्ष जात नाहीं इतकेंच नाहीं तर परधर्मांप्रमाणें व्यवहार करणें नकलीपणाचें वाटून शेवटीं नक्कल करणाऱ्यांचीच जेव्हां नक्कल

होते तेव्हां परधर्म भयावह वाटल्याशिवायहि राहत नाहीं. अशी सुज्ञ मंडळी जगांत आहेत म्हणूनच धर्मक्षेत्रांत नैसर्गिक शास्त्राचें ज्ञान सांगणारी ब्राम्हण जात आणि कर्मक्षेत्रांत राजकरणाचें ज्ञान सांगणारे कायदेपंडीत हेहि आहेतच आणि दुतोंडी शेपाची परम्परा वाढीस लावणाऱ्यांनीं कितीहि तमोगुण दाखविला आणि ब्राम्हणांना आणि कायदेपंडीतांना खालीं जरी ओढण्याचा प्रयत्न केला तरी हिंदुस्थानांत धर्मक्षेत्रांत ब्राम्हण आणि कर्म क्षेत्रांत कायदेपंडीत हे सतत राहणारच मग इतर जातीचे लोक आणि इतर कर्म करणारी मंडळी कांहीं हि म्हणोत! आणि ब्राम्हण असून ब्राम्हणत्व न राखणारे असे अब्राम्हण आणि कायदे पंडीत असून वकीली न करणारे अवकील कितीहि त्यांनां दुजोरा देवोत! धर्म क्षेत्रांत ब्राम्हण आणि कर्म क्षेत्रांत कायदेपंडीत पूर्वी जसे होते तसेच ते आज आहेत आणि पुढेंहि ते राहणारच यांत संशय नाहीं. असें आहे म्हणूनच इतर जातींत बरें वाईट लोक जसे आहेत तसेच ब्राम्हण जातींत बरे वाईट लोक असतांना फक्त ब्राम्हणावरच अपशब्दांचा भडीमार का होतो आणि इतर कर्म करणाऱ्यांत

बरे वाईट लोक जसे आहेत तसेच कायदेपंडीतांत बरे वाईट लोक असतांना फक्त कायदे पंडीतांवरच अपशद्बांचा भडीमार कां होतो! हे समजणें कठीण नाहीं आणि सुज्ञ मंडळींचा सहवास घडला तर त्याचें रहस्यहि समजल्या शिवाय राहत नाहीं आणि हें रहस्य समजलें म्हणजे नैसर्गिक धर्मातील धर्मक्षेत्रांत ब्राह्मण जसे श्रेष्ठ आहेत असें पटतें आणि कर्मक्षेत्रांत कायदे-पंडीत श्रेष्ठ आहेत असेंच पटल्याशिवाय राहत नाहीं त्याच प्रमाणें कृत्रीम धर्मातील धर्मशास्त्र नैसर्गिक दृष्टया पूर्णपणें पोषक जरी नसलें तरी त्या शास्त्राची धर्मबंधना करितां अवश्यकता असल्यामुळें अशा शास्त्राचेंहि अध्ययन करणारेच त्या धर्मक्षेत्रांत श्रेष्ठ आहेत आणि कर्म क्षेत्रांत कायदे पंडीतच श्रेष्ठ आहेत हेंही पटल्या शिवाय राहत नाहीं. अशाप्रकारें नैसर्गिक असलेल्या आणि कृत्रीम झालेल्या सर्व धर्मांत स्वधर्माची जाणीव ठेवणारे आणि वाढविणारे सुज्ञ मंडळींसारखें संत जगांत वावरत आहेत म्हणूनच जग एकसारखें वाढीसच लागलेलें आहे. अशा सुज्ञ मंडळीच्या सहवासानेंच जगांत वावरणाऱ्यांना जेव्हां परोपकार करणाऱ्या साधूंची ओळख पटून आशीर्वाद

ग्रंथ... क्र. ...



प्राप्त होतो आणि मी दुःख्या झोंपडांतून आपला बचाव करूनल घेतां येतो आणि घरघुडे न होतां परमार्थ घडतो तेव्हां अशा जनता कोणत्याहि तन्हेगुगी प्रकाराला बळी पडत नाहीं इतकेंच नाहीं तर मोठमोठीं चांगलीं गोड नावें धारण करून भुरळ घालणाऱ्या जहरी दुतोंडी शेषाची परम्परा वाढविणाऱ्यांच्या नकली वर्तनाला आणि चेष्टांनाहि जनता भीत नाहीं. अशा प्रकारें जगांत व वरणाऱ्याचें भवभय जसजसें कमी होत जातें तसतसें त्यांचा भवसंदेहहि नाहीसा होतो आणि त्यामुळेंच कलंकी अवतारांत विश्वजनाचा भवसंदेह नाहीसा करणें हें जें ईश्वराचें ध्येयहि ठरलेलें आहे त्याचीच प्रचिति वारंवार येत असल्यामुळें सुज्ञ मंडळी ईश्वर स्वरूपीं आहेत असें वाटल्या शिवाय राहत नाहीं. म्हणून अलौकिक धैर्य दाखवून भवभय हरण करणारें धर्मनिष्ठ आणि कर्मनिष्ठ स्वाभिमानी. कर्मयोग चें रहस्य सांगून गरीबांना श्रीमंत होण्याच्या मार्गास लावणारे आणि श्रीमंतांची श्रीमंती वाढविणारे, घराची मर्यादा वढवून शेजारच्या घरीं असलेल्या पोरांवर घरच्या पोटच्या गोळ्याप्रमाणें प्रेम करणारे आणि स्वकष्टार्जित एपतीवर राहणारांनीं केलेला गरीबी आणि

श्रीमंती स्वार्थत्याग सारखाच परमार्थ समजणारे सुज्ञ मंडळी सारखें संत जगांत अन्य आहेत यांत संशय नाहीं. मग तमोगुणी भोंदू आणि रजोगुणी घरबुसे कांहींहि म्हणोत! भक्तिमार्ग प्रतिपादन करणारे संत आणि कर्मयोगाचें रहस्य सांगून लोकांत जागृति उत्पन्न करणारे संत हें दोघेहि जगांत व्यवहार आणि परमार्थ साधणारे एकाच योग्यतेचें असल्यामुळें सुज्ञ मंडळी सारख्या संताबद्दल जेव्हां मनांत विचार येतात तेव्हांच "कामांत काम भज राम नाम" म्हणून कर्म करीत असतांना ईश्वराचें स्मरण केल्यानें कर्माचें फल जें प्राप्त होतें तें सुख दायक असतें आणि स्वधर्मामुळें शक्तीची वाढ होऊन शरीरांत येणारा प्रफुल्लितपणा आणि कर्मामुळें वरपांगी दिसणारी चमक यांच्या संयोगानें म्हणजे धर्म आणि कर्म यांच्या संयोगानें जेव्हां सुख प्राप्त होतें तेव्हां त्याला कारण असलेल्या सुज्ञ मंडळी सारख्या संतांच्या सहवासाला विसरणें जगांत तरी वावरणाऱ्यांना शक्य असेल असें वाटत नाहीं. धर्मानें कर्माला जोर येतो आणि कर्मानें धर्माला बळकटी येते. नुसता धर्मच पाळला आणि कर्म न घडलें तर त्याचा

जसा जगांत उपयोग नाहीं त्याच प्रमाणें नुसतीं कर्मे घडलीं आणि जर धर्माचा जोर नसला तर कर्म करणाऱ्यांचाहि जगांत व्हावा तसा उपयोग होत नाहीं. धर्मानें मनुष्य प्रफुल्लित दिसेल पण तो जर नेहमी जगाशीं फटकून राहील तर जगांत त्याचा काय उपयोग? आणि जगांत राहून कर्मे करणारी मंडळी धर्मभ्रष्टते मुळें अशक्त झालेलीं असलीं तर त्यांच्याहि कर्माचें तेज जगांत तरी कसें पडणार? आणि अशा अशक्त मनुष्याचाहि जगांत काय उपयोग? म्हणून जगांत धर्म आणि कर्म ह्या दोहोंचें सारखेंच महत्त्व असून तें ज्यांच्या सहवासानें कळतें ती सुज्ञ मंडळी जगांत धन्य आहेत यांत संशय नाहीं आणि अशा सुज्ञ मंडळींच्या सहवासानें मनाला आनंद झाल्याशिवायहि राहत नाहीं. म्हणून मनांत आलेले विचार मनांतच दाबून न ठेवितां मन मोकळें करून ते विचार लेखाच्या द्वारें जसेंच्या तसेंच सुज्ञ मंडळीपुढें ठेवून त्यांची नम्रपणें प्रार्थना करणें हीच लेखाची प्रस्तावना आहे असें समजून मी तरी माझ्या लेखाची ही प्रस्तावना येथेंच संपविण्याची परवानगी घेऊन आजि गतपर्यंत " जग आणि जगाची वस्तु " ह्या

लेख लिहिल्यानंतर त्याला वाढीस लावण्याकरितां कारण असणारे "गृह आणि गृहस्थ" हा विषयहि ओघानेंच येत असल्यामुळें आणि सुज्ञ मंडळींनींहि त्या विषयावरच लेख लिहिण्याची आज्ञा केलेली असल्यामुळें तोच विषय लेखाकरितां ठरवून लेखाला आरंभ करण्यापूर्वी सुज्ञ मंडळीसारख्या संतांची प्रार्थना केल्यानंतर ईश्वराचीहि प्रार्थना करणें ओघानेंच येत असल्यामुळें ईश्वराची प्रार्थना करण्याची परवानगी घेतों.

श्री.



# ईश्वर प्रार्थना.

जगांत जोंपर्यंत प्रत्येक जीवाला आई बापा पासून जन्म मिळणें नैसर्गिक आहे असेंच दृष्टोत्पत्तीस

पडतें आणि आईबाप शिवाय जीवांचा जन्म होणें शक्य दिसत नाहीं तों पर्यंत आई बापाचा आईबाप मूळ पुरूष असणें नैसर्गिक असल्यामुळें तो मूळ पुरूष नाहीं असें म्हणणें केंव्हांहि शक्य होणार नाहीं. तो मूळ पुरूष जगाचाहि नियंता असल्यामुळें अथवा जगाची वाढ त्या मूळ पुरूषापासून झाली असल्यामुळें त्याला जरी कांहींनीं ईश्वर म्हटलें आणि इतरांनीं दुसऱ्या एखाद्या नांवानें संबोधिलें तरी त्याचें मूळ पुरुषत्व जात नाहीं आणि म्हणूनच त्याला कोणी हि दुसऱ्या नांवानें ओळखिलें तरी बहुजनसमाज त्याला ईश्वर म्हणत असल्यामुळें त्या मूळ पुरुषाला ईश्वरच म्हणणें बरें वाटतें. प्रत्येक जीवाला आई बापाचें स्मरण होणें स्वाभाविक असल्यामुळें ईश्वराचें हि स्मरण होणें स्वाभाविक आहे. आईबाप ज्या प्रमाणें कृपाळू असतात त्याचप्रमाणें ईश्वरहि कृपाळूच आहे. आणि आईबाप चांगल्या मुलांचें कौतूक करून वाईट वर्तन करणाऱ्या मुलांना शिक्षा जेव्हां करितात तेव्हां शिक्षा करण्यांतहि त्यांचें कृपाळूपणच असतें. त्याचप्रमाणें ईश्वरहि चांगल्या जीवांचें कौतूक करून वाईट वर्तन करणाऱ्या जीवांना शिक्षा जेव्हां करतो तेव्हां शिक्षा

करण्यांतहि त्याचें कृपाळूपणच असतें. कारण वाईट वर्तन करणाऱ्यांना जर वेळींच शिक्षा न झाली तर पुढें त्यांना चांगलें वळण लागणें केव्हांहि शक्य नसल्यामुळें ते सुद्धां आईबापाला आणि ईश्वराला कृपाळू आहे असें पुढें कधींहि ह्मणणार नाहींत. ह्मणून कर्मप्रमाणें जेव्हां फळ भोगण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं जर दुःख झालें तर तें आपल्या पूर्वकर्मांचें फळ असून तें भोगलेंच पाहिजे असें वाटल्यावाचून राहत नाहीं. कारण त्याला आईबापानें तरी काय करावें आणि ईश्वरानें तरी काय करावें? घरांत आईबापाच्या शिक्षणाखालीं मुलांना वळण लागतें ह्मणून मुलांमध्यें बंधु भगिनींचें नातें विशेष महत्वाचें असतें. कारण एकाच परिस्थितींत मुलांना आई बापाच्या शिक्षणाखालीं राहावयाचें असल्यामुळें सर्व मुलांचें लक्ष नेहमीं आईबापाकडे असतें आणि केव्हां कोणावर कसा प्रसंग येईल! या धाकामुळें त्यांची एक-मेकावर नजर असते. म्हणून घरांत जीं इतर नातीं असतात त्या सर्व नात्यांत बंधुत्वाच्या नात्यालाच विशेष महत्त्व असणें सहाजिक आहे आईबापानें वाईट वर्तन करणाऱ्या मुलांना जरी शिक्षा केली आणि चांगलें वर्तन

करणाऱ्या मुलांचें कौतूक करून त्यांना खाऊ दिला तरी चांगलीं मुलें आपला खाऊ इतर बंधूना दिल्या शिवाय राहत नाहींत. आणि ज्यांना शिक्षा मिळते ती मुलेंहि अशा सुख भोगणाऱ्या बंधुंचें खाऊ दिल्याबद्दल कौतूक करून तसाच खाऊ आपण स्वतः केव्हां मिळवूं असें त्यांना होऊन जातें तेव्हां बंधुत्वाचें नातें घरांत किती महत्वाचें आहे, हें समजणें कठीण जात नाहीं. घरांत बंधु व त्याच नात्याला जसें विशेष महत्व आहे तसेंच घराची मर्यादा ज्या मानानें विश्रांत वर्णितां येईल त्यांमानानेंच जगांतहि विश्वबंधुत्वाच्या नात्याला विशेष महत्व आहे, हें समजणें कठीण नाहीं. आणि विश्व बंधुत्वाचें नातें आहे म्हणूनच ईश्वरानें चांगलें वर्तन करणाऱ्या जीवांना स्वर्गसुख दाखविलें आणि वाईट वर्तन करणाऱ्या जीवांना नर्कवास भोगावयास लाविले तरी स्वर्गसुख भोगणारे जीव नर्कवास भोगणाऱ्या जीवावर प्रेम केल्याशिवाय राहत नाहींत आणि त्या बद्दल नर्कवास भोगणारे जीव स्वर्गसुख भोगणाऱ्या जीवांच्या मोठेपणाचें कौतूक केल्या वांचूनहि राहत नाहींत. म्हणूनच घरांत बंधुत्वाला जसें महत्व आहे तसेंच जगांत विश्व-

बंधुत्वालाहि महत्व आहे. परतु त्या बंधुत्वांत प्रेम असेल तरच तें बंधुत्वाचें नातें महत्त्वाचें आहे. नाहीं तर नुसतें बंधुत्व म्हणून भाऊबंदकीची जर वाढ झाली तर ती नुकसानीसच कारण आहे. बंधुत्व जसें घरांत आहे तसें जगांत विश्वबंधुत्वहि आहेच. म्हणुन नुसतें बंधुत्वाचें नातें सांगून भागत नाहीं तर बंधुत्वामध्यें प्रेम उत्पन्न करणें जरूरीचें आहे. प्रेम जर नसलें आणि भाऊबंदकी वाढली तर अशा बंधुत्वाला महत्व कसें राहणार? आणि भाऊबंदकीमुळें जीं भांडणें होतात तीं जगाला मान्य नसल्यामुळें ईश्वराला तरी तीं कशीं रुजू होणार? आणि चांगलें वर्तन करणाऱ्यांनीं मिळालेला खाऊ बंधुप्रेमामुळें सर्वांना वाटून देण्याचा मोठेपणा दाखविला म्हणून शिक्षा पावलेल्यांनीं खाऊ वाटून दिलाच पाहिजे असा हक्क दाखवून भाऊबंदकी जर वाढविली तर ती कोणाला जगांत तरी मान्य होईल असें वाटत नाहीं, मग ईश्वराला तरी तें कसें आवडणार? म्हणून नुसतें बंधुत्वाचेंच महत्व सांगून प्रेमाची वाढ न करितां जर गूपचूप राहिलें तर भाऊबंदकीची वाढ होते, आणि त्यामुळें जें नुकसान होतें तें न व्हावें, या हेतूनें

जर प्रेमाची वढ केली तर चांगलें वर्तन करणाऱ्यांनीं घालून दिलेला खाऊं ग्रहण केल्यानंतर तसाच खाऊं स्वतः मिळवून त्यांना परत केल्या शिवाय बरें वाटत नाहीं आणि स्वतः मिळविण्याची शक्ति नसेल तर त्यांच्या माठे पणाचा फायदा घेऊन त्यांच्या भरंवशावर खाऊं न खातां तो न खाणेंच बरें असें त्याना वाटल्या शिवाय राहत नाहीं. मग भाऊ भंदकीची वढ करून खाऊं दिलाच पाहिजे असा हट्ट कोण धरणार! आणि जर त्या बद्दल कोणी हट्टच धरला तर त्याला कोण काय करणार? आणि अशा हट्ट धरून बसणाऱ्या आयदी मुलांना वळण लावून शुद्धीवर आणण्याकरितां जर आईबाप शिक्षा करितात तर मग विश्वांतहि आयत्या बिळावर नागोबा होऊन बसण्याचें ध्येय ठेवणाऱ्या आणि इतरांच्या भरंवशावर चैन करण्याची इच्छा ठेवणाऱ्या हट्टी अशा आयदी जिवांना विश्वाचा मूळ पुरुष आईबाप जो ईश्वर तोहि शिक्षा केल्या वाचून कसा राहणार! म्हणून जगांत विश्वबंधुत्वाचें सनातन असलेलें नातें कबुल असणें जरी स्वाभाविक असलें तरी त्यांत भाऊबंदकी न ठेवितां प्रेमच उत्पन्न करावें लागतें आणि प्रेम उत्पन्न झालें म्हणजे

उत्तम कर्में करणाऱ्यांना सुखी झालेलें पाहून वाईट न वाटतां त्यांचें कौतुकच वाटतें आणि अशा प्रकारें भाऊबंदकी जेव्हां नाहींशी होते तेव्हां आईबापानें चांगलें वर्तन करणाऱ्या मुलांचें कौतुक केलें पाहून घरांत जसें वाईट वाटत नाहीं त्याच प्रमाणें विश्वांतहि सुखी मनुष्याकडे पाहून वाईट वाटत नाहीं. त्या योगें नैसर्गिक धर्मांत असलेल्या नैसर्गिक जातींत कोठेंहि जन्म झाला असला आणि त्यांत गर्भ श्रीमंती अगर जन्म दारिद्र्य भोगावयास लाविलें असलें तरी तें पूर्व कर्मानुरूप असल्यामुळें त्याबद्दल ईश्वरालाहि दोष देण्याचें कारण राहत नाहीं. ईश्वर कर्मानुरूप जन्मास घालतो म्हणून हा जन्म सिद्ध प्राप्त होणारा हक्क मिळणें मनुष्याच्या हातांत नाहीं. परंतु जन्म झाल्यानंतर पुढें जन्म सिद्ध हक्काचें पालन करणें मात्र मनुष्यांच्या हातांत आहे यांत संशय नाहीं. त्याच कारणामुळें क्षत्रीय जातींत जन्मास आलेल्या पांडवांना भगवान श्रीकृष्णानें क्षत्रीय धर्म जो सांगितला तो जन्म सिद्ध हक्क म्हणूनच सांगितला हें भगवत्गीते वरून सिद्ध होत असून मग जन्मसिद्ध हक्काची जाणीव न ठेवतां कृत्रीम उपायानें

आकांक्षी वाढविणें ईश्वराला तरी कसें रुजूं होणार ? आणि जन्माशिवाय जन्मसिद्ध हक्क ईश्वराशिवाय इतर तरी कोण देऊं शकणार? असें असल्यामुळेंच पूर्व कर्मा-नुरूप जन्म जरी नैसर्गिक मिळाला तरी त्याचें पालन जन्मसिद्ध हक्कान्वयें न होतां भलतेंच कर्म जर घडलें तर त्या कर्मानुरूप पुढें जन्म होणें नैसर्गिक असल्यामुळें कर्म करीत असतानाच जन्म होण्याच्या पूर्वीच नैसर्गिक हक्क मिळणें शक्य नाहीं. तुप खाऊं लागल्या बरोबर जर रुपांत बदल होत नाहीं परंतु कांहीं वेळ वाट पाहावी लागते अथवा जहर घेतल्याबरोबर अंगीं जहर भिनल्याशिवाय मरणसुद्धां येत नाहीं अथवा हातांत पुस्तकें घेऊन शाळेंत जाऊं लागल्याबरोबर विद्वान होतां येत नाहीं, मग एखादें कर्म करूं लागल्या बरोबरच पुन्हां जन्म मिळाल्या शिवाय त्या कर्माचा जन्मसिद्ध हक्कदार तरी कोण कसा होऊं शकणार ! फार झालें तर कर्म करतो म्हणून त्या कर्माचा तो तज्ज्ञ होऊं शकेल परंतु तज्ज्ञ झाला म्हणून अथवा विद्यार्थी असला म्हणून त्याचा तो जन्मसिद्ध हक्क आहे असें म्हणणें नैसर्गिक धर्मांत तरी पूर्वी शक्य नव्हतें आणि आजहि शक्य

नाहीं. असे प्रकार आहेत म्हणूनच हिंदुस्थानसारख्या मूळ भूमींत हिंदुस्थान हिंदुस्थान आहे तों पर्यंत नैसर्गिक जाति सनातन असल्यामुळें जन्मसिद्ध हक्कान्वयें असलेला ब्राम्हण सुताराचें कर्म करण्यांत तरबेज झाला तरी त्याला बरावर वांसें ठोकण्याकरितां सुतारजातीचाच मनुष्य पाहावा लागतो आणि ब्राम्हणाचें सुतारकीचें ज्ञान घरांत बसून पेट्या करण्यापुरतें अथवा खुर्च्याकरण्यापुरतें आरामीचें असतें अथवा जबरदस्तीनें कर्म करावेलें तर तें काम कसें बिघडतें हें ज्याच्या प्रत्ययास येत नसेल त्याला हिंदुस्थानची माहिती नाहीं असेंच म्हणावें लागेल.

कांहींहि झालें आणि कितीहि केलें तरी संवय आणि स्वभाव यांत अंतर राहणारच. त्याच कारणामुळें संवय दुय्यम स्वभाव ठरतो, आणि नैसर्गिक धर्मांत आणि कृत्रीम धर्मांत जसें अंतर असतें तसेंच अंतर संवयीमध्यें आणि स्वभावामध्यें असल्यामुळें कृत्रीम धर्मांत धर्मांतर जरी केलें तरी नैसर्गिक धर्म अजिबात जसा नाहींसा होत नाहीं, त्याचप्रमाणें संवयीनें मूळ स्वभाव अजिबात

जात नाहीं आणि संवयीला स्वभाव होण्याकरितां नैसर्गिक जन्माची वाटच पाहिली पाहिजे यांत संशय नाहीं. संगतीनें वाईट संवय लागते आणि त्या पासून त्रास होतो. परंतु संवयीचा परिणाम ज्याचा त्यालाच ज्यास्त भोगावा लागतो, ह्मणून संगत चांगली पाहिजे. मूळस्वभाव कधींहि जात नाहीं परंतु संवय वाटेल तेव्हां जशी लागते तशीच ती सुटूंही शकते. ज्यांना लागलेली संवय सोडावयाची इच्छा होत नाहीं त्यांना संवय सुटत नाहीं असें ह्मणणें ह्मणजे ती पळवाट आहे. खरें पाहिले असतांना संगतीनें वाईट संवयी सुटतात यांत संशय नाहीं. ह्मणूनच जगांत वावरणारे ईश्वराची प्रार्थना जेव्हां करतात, तेव्हां सुज्ञ मंडळी सारख्या संतांची संगत मिळण्याबद्दलच त्यांची प्रार्थना असते. कारण पुष्कळ धन मिळालें आणि गर्भश्रीमंत जरी असला तरी संगत चांगली नसली ह्मणजे दारिद्र्य यावयास उशीर नाहीं तसेंच चांगली संगत जर मिळाली तर गरीबाचा श्रीमंत होण्यासहि उशीर लागत नाहीं. म्हणून संगत पाहिजे आणि ती सुज्ञ मंडळी सारख्या संतांची पाहिजे ह्मणजे कर्मं चांगलीं घडतात आणि जीं फलें प्राप्त होतात तीं आपल्याच

कर्मानुरूप असल्यामुळें इतरांना दोष देण्याचें कारण राहत नाहीं. ह्मणून जन्म कितीदां जरी जगांत झाला तरी हरकत नाहीं परंतु संतांची संगत देण्याबद्दलच ईश्वराची प्रार्थना करणें जरूरीचें आहे यांत संशय नाहीं. ईश्वराचा आकार फारच मोठा असून त्या विराट स्वरूपाच्या तोंडांत एका बाजुसच राहण्या जोगें विश्व लहान असल्यामुळें विश्वजनांना जरी तो पूर्णपणें दिसणें शक्य नसलें तरी ईश्वरापासून सर्व जग झालेलें असल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं त्याचा अंश आहे हें लक्ष्यांत आल्यावांचून राहत नाहीं. मुलगा ज्याप्रमाणें आईबापाचा प्रतिनिधी आहे त्याचप्रमाणें विश्वांतील प्रत्येक वस्तु ईश्वरमय असल्यामुळें त्यांत ईश्वराचें प्रतिनिधित्व आहे. निराकार असलेल्या पाण्याचा एक थेंब घेतला तरी थेंबभर पाणी जसें पाणी आहे तसेंच पाणी सुद्धां ज्याच्या पासुन उत्पन्न झालेलें आहे अशा निराकार ह्मणजे ज्याचा फारच मोठा आकार आहे अशा ईश्वराचें सर्व विश्व असल्यामुळें विश्वांत असलेल्या एका रेतीच्या कणांत सुद्धां ईश्वर आहे असें म्हणणें चुकीचें होत नाहीं. मग मनुष्यरुपांत ईश्वर आहे असें मानलें तर त्यांत आश्चर्य कसलें? असें आहे ह्मणूनच नैसर्गिक

असलेल्या हिंदुस्थान सारख्या पुण्यभूमींत ३३ कोटी असलेल्या सर्व मनुष्यांना देवता म्हणून हिंदुस्थानांत ३३ कोटी देवता आहेत असें ह्मणणें नैसर्गिक दृष्ट्या किती बरोबर आहे हें समजणें कठीण नाहीं आणि नैसर्गिक धर्मांतील लोक ३३ कोटी देवता मानतात इतकेंच नाहीं तर कृत्रीम धर्मांतील लोक सुद्धां त्यांना ईश्वराचीं लेंकरें समजून जेव्हां एकमेकाशीं प्रेमानें वागावें असें म्हणतात तेव्हां ईश्वराचीं लेंकरें ह्मणणें अथवा देवता ह्मणणें यांत मुळींच अंतर नाहीं हें उघड होतें. अशा प्रकारें सर्व जीव देवता अगर ईश्वराचीं लेंकरें असलीं तरी गटारांतून वाहणारें पाणी अमंगळपणामुळें ग्रहण करण्यास वर्ज ठरून चांगलें पाणी जेथें असेल तेथें आराम मिळतो त्याचप्रमाणें चांगलें वर्तन करणाऱ्या मनुष्यरुपीं देवता पाशींच आराम मिळतो. आणि त्यांचा सन्मान करणें याला पूजा ह्मणून मनुष्य मूर्ती असल्यामुळें मनुष्याच्या सन्मानालाच मूर्तीपूजा ह्मणणें ओघानेंच येतें. त्याच कारणामुळें नैसर्गिक धर्मांतील मंडळीच काय, तर कृत्रीम धर्मांतील मंडळी सुद्धां जोंप. र्यंत मनुष्यांचा सन्मान करून चांगलें वर्तन केल्याबद्दल

त्यांची सेवाहि करतात आणि हारतुरे घालून त्यांना मिरवितात तोंपर्यंत जगांत मूर्तिपूजा आहे हें उघड आहे. जगाची जशी वाढ झाली तशीच मूर्तिपूजेमध्येंहि वाढ झालली असल्यामुळें मनुष्य मृत्यु नंतर अदृश्य होत असल्याकारणानें मनुष्यांच्या छायाचित्राचें पूजन झालें आणि त्यांना हार घालून त्यांचा सन्मान झाला आणि छाया चित्रहि कांहीं काळानंतर नाशिवंत होणारे असल्यामुळें दगडाचें चित्र करून आणि त्या चित्राची पुजा करून सन्मान करण्या पर्यंत मजल आली तर ही मूर्तिपूजेची वाढ ज्या नैसर्गिक असलेल्या हिंदु धर्मामध्यें झाली तीच मूर्तिपूजा पर्यायानें कृत्रिम धर्माला सुद्धां मान्य आहे यांत संशय नाहीं. आणि पूर्ण पणें मान्य नसली तरी मनुष्यांचा सन्मान करून त्यांची सेवा करण्याची पहिली पायरी गांठून त्यांनीं मूर्ति पूजेला आरंभ केलेला असल्यामुळें त्यांना मूर्तिपूजा कबूल आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. कारण मनुष्यही मूर्ति नव्हे आणि सन्मान करणें म्हणजे पूजा नव्हे असें म्हणण्याचें कोणी धाडस करतील असें वाटत नाहीं. अशाप्रकारें नैसर्गिक धर्मातील आणि

ठिकाणीं कधीं कधीं धूप दाखवून हारहि चढविला जातो आणि बत्ताशाची अथवा चिरोंजीची खिरापतहि वाटली जाते हें माहीत असून मूर्तिपूजेला त्यांचा सरसकट विरोध आहे असें म्हणणें म्हणजे त्याना हिंदुस्थानची माहिती नाहीं असेंच म्हणावें लागेल. अशा प्रकारें कसेहि निरनिराळे प्रकार असले आणि जे ते आपआपल्या रिवाज प्रमाणें ईश्वराचें स्मरण करून त्याची सेवा करीत असलें तरी त्या सर्व प्रकारांत मूर्तिपूजा आहेच आणि जोंपर्यंत जन्मसिद्ध हक्कान्वयें वापरणें बहुमानाचें आहे तोंपर्यंत पर्यायानें कां होईना त्यांनाहि हिंदुत्वच आल्या शिवाय राहत नाहीं. जन्मसिद्ध हक्काची जाणीव असणें म्हणजेच हिंदुत्व आहे. म्हणूनच हिंदू बनविल्यानें बनत नाहीं, तर त्याला जन्मानेंच हिंदुत्व येतें. वाटलेल्या हिंदुना शुद्ध करून घेणें म्हणजे हिंदू बनविणें नसून त्यांना जन्म सिद्ध हक्काची जाणीव करून देऊन त्यांना शुद्धीवर आणणेंहि योग्यच आहे आणि हें ईश्वरालाहि रुजूं होणारें आहे. कारण पश्चातापानें जे शुद्ध होतात त्यांना अशुद्ध कोण करूं शकणार? ईश्वराची सेवा करीत असतांना जितकी ज्यास्त स्वच्छता

राहिल तितकी चांगली आहे. म्हणूनच स्नान करून पूजा करणें ज्यास्त चांगलें असलें तर यांत आश्चर्य कसलें? पितांबराची उत्पत्ति अमंगळ सांगून कांहीं लोक पूजा करताना पितांबर नेसणें वाईट समजतात. परंतु पितांबरांत कोणती शक्ति आहे हें ते जाणत नाहींत. उत्पत्ति अमंगळ प्रकारानें असली म्हणून त्याला नेहमी पुढेंहि जर अमंगळ मानलें तर मनुष्य सुद्धां त्या दोषां-तून सुटूं शकेल असें वाटत नाहीं. मग इतर प्रकार तर राहूंच द्या! शेतांत धान्याला खत कोणतें? खतांत अमंगळ प्रकार म्हणून जर धान्यहि अमंगळ ठरेल आणि मनुष्येंहि अमंगळच ठरतील तर पितांबरहि पूजेला वर्ज ठरेल. परंतु तसें नाहीं म्हणूनच पूजा करताना पितांबर अथवा रेशमी वस्त्र ज्यास्त चांगलें आणि त्यांच्या खालोखाल धूत वस्त्र आहे. ईश्वर पितांबरधारीहि आहेच. ईश्वराची पूजा करीत असताना जितकी स्वच्छता पाहिजे तितकीच स्वच्छता अन्नग्रहण करतांना पाहिजे आणि स्वच्छतेबरोबर विद्युत् शक्तीहि त्यांत पाहिजे. म्हणून रेशमी वस्त्राला ज्यास्त महत्व आहे. असें असल्यामुळें जितकें ज्यास्त जसें आचरण होतें तितकेंच

ज्यास्त तें फायदेशीर असणें साहजिक आहे आणि कमी आचरण जर असलें तर तें मुळींच उपयोगी नाहीं असें नाहीं. जितकी ज्यास्त विद्या संपादन करावी तितकी ज्यास्त विद्वत्ता येते म्हणून कमी विद्यार्जन करणारा शिक्षित नाहीं असें नाहीं. शिर-गणतीच्या प्रसंगीं ज्या प्रमाणें कमी आणि ज्यास्त विद्यार्जन करणारे हें सर्व शिक्षितच समजले जातात त्याचप्रमाणें जगांतहि ईश्वराची कमी आणि ज्यास्त प्रमाणानें सेवा करणारे हे सर्व पूजकच ठरतात आणि जे ज्या मानानें जन्मसिद्ध हक्काची जाणीव ठेऊन स्वधर्माचें पालनच करतात ते त्या मानानेंच जगांत सुखीहि झाल्याशिवाय राहत नाहींत. स्वधर्म पाळून जर कर्म घडलीं तर स्वधर्मानें अंगीं असलेल्या प्रफुल्लितपणाला चमक येऊन कर्मांतहि यश येतें. परंतु स्वधर्माच्या अभावीं जेव्हां कर्मे घडतात तेव्हां अशी कर्मे करणाऱ्यांनीं कितीहि कृत्रिम चमक दाखविण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्या तोंडावरील फिकेपणा जात नाहीं इतकेंच नाहीं तर असलेला फिकेपणा वाढत जातो आणि घोटून घोटून तेल लावून

त्यावर पूड लाविली म्हणजे कधीं कधीं ते सोंगा-सारखें सुद्धां दिसल्याशिवाय राहत नाहींत. म्हणून स्वधर्माची जाणीव ठेवून जे कर्में करतात तेच जगांत चमकतात, आणि ईश्वरहि दशांगुली उरलेला असल्यामूळें ज्या हाताला दहा अंगुल्या आहेत त्या हातानें जीं कर्मे घडतात त्या कर्मांचें ठिकाणीं ईश्वराचें वास्तव्य आहे हें लक्षांत आलें ह्मणजे जगांत कर्मयोगच श्रेष्ठ आहे हें ठरतें आणि अनुभवानें पटतेंहि.

मनुष्यांना जन्म झाल्यापासून मरेतोंपर्यंत रोज काहींना कांहीं तरी रोगानें पीडा होतच असते आणि रोग निवारण करण्या करितां औषध पाणी एकसारखेंहि सतत चाललेंच असतें. ह्मणूनच रोगानेंच मनुष्य मृत्युमुखीं न पडतां मृत्युसमयीं कोणताना कोणता तरी रोग मनुष्याला असतोच. मनुष्याला मृत्यु टाळणें जरी शक्य नसलें तरी मृत्यु येत तांपर्यंत रोगापासून भोगावा लागणारा त्रास आणि दुःख औषधामुळें कमी होत असल्यामुळेंच औषधहि दिलें जातें. रोग निवारणार्थ जीं औषधें दिलीं जातात तीं अनुभवानें ठरविलेलीं असल्यामुळें ज्याना जसा

अनुभव असेल त्या अनुभवा प्रमाणें तज्ञांकडून औषधाची योजना होते आणि त्या योगें रोगहि शांत होतो. असें असलें आणि औषधामध्यें नाना प्रकार असलें आणि मनुष्यांत असलेल्या भिन्न प्रकृतीमुळें एकाच रोगा वरील औषध सुद्धां निरनिराळ्या अनुपानांत दिलें गेलें, तरी कांचेच्या निरनिराळ्या रंगाच्या शिशामधील पाण्यावर सूर्य तेजाच्या प्रकाशानें जो परिणाम होतो त्या पाण्याच्या सेवनानेंहि मोठमोठाले रोग जेव्हां बरें होताना दिसतात तेव्हां सकाळीं स्नान करून अंगीं विद्युत शक्ति आगल्यानंतर सूर्याला अर्घ देतांना कांचे सारख्या असलेल्या डोळ्यांवर सूर्य तेजाचा प्रकाश घेऊन उघड्या शरीरावर तेजाचा प्रकाशहि घेणारे अथवा सकाळीं सूर्याला नमस्कार करून त्याचें स्तवन करीत असताना कांहीं वेळ सूर्य तेजाचाच प्रकाश फक्त डोळ्यावरच घेणारे बरेच लोक निरोगी कां असतात? हें समजणें कठीण नाहीं. सूर्यरूपी तेजापासून जगांत वावरणाऱ्यांना आनंद होत असल्या-मुळें हें तेज जर कोणाचें असेल तर तें तेज ईश्वराच्या तेजा शिवाय इतर कोणाचें असूं शकणार? मनुष्यांत जें तेज आहे तें तेज सूर्याच्या तेजाचा अंश असल्यामुळें

मनुष्यांचे तेज अग्नि नव्हे. कारण सूर्याचें तेज अग्निसारखें प्रकाशतें तरी अग्नि नव्हे. अग्नि कृत्रीम असल्या-मुळें पाण्याचा स्पर्श झाला कीं अग्नि विझून जातो, परंतु मनुष्यांत असलेलं तेज पाण्याच्या स्पर्शानें विझून जात नाहीं ह्मणून तें तेज नैसर्गिक आहे. आणि हें तेज ज्या तेजाचा अंश आहे तें ईश्वराचें तेज सूर्य रुपानें जगावर प्रकाशणेंहि नैसर्गिकच आहे. म्हणूनच सूर्यरुपीं तेज कधींहि विझणें अथवा कोळजून जाणें शक्य नाहीं आणि कृत्रीम असलेल्या अग्निसारखें विझत नाहीं अथवा काळजून जात नाहीं. म्हणूनच तें सूर्यरुपी तेज मनुष्या-पेक्षां मोठा असणाऱ्या अशा मूल पुरुषाचें ह्मणजे ईश्वराचें आहे यांत तिळमात्र संशय नाहीं. म्हणून सार्वजनिक अशा ईश्वराची जर प्रार्थना करा-वयाची झाली तर ती प्रार्थना, आकाशावर असलेल्या पाण्यांत्त जें ईश्वराच्या तेजाचें प्रतिबिंब सूर्यरुपानें जगा-वर प्रकाशतें त्या सूर्य नारायणाला, करण्याकरितां त्याला सकाळीं नमन करतांना दोन्ही हात जोडिले म्हणजे मग त्या हातानें दिवसभर चांगलीं कर्मे घडल्याशिवाय कशीं राहणार ? आणि कर्मे करीत असताना ईश्वराचें स्मरण

अनुभव असेल त्या अनुभवा प्रमाणें तज्ज्ञांकडून औषधाची योजना होते आणि त्या योगें रोगहि शांत होतो. असें असलें आणि औषधामध्यें नाना प्रकार असलें आणि मनुष्यांत असलेल्या भिन्न प्रकृतीमुळें एकाच रोगा वरील औषध सुद्धां निरनिराळ्या अनुपानांत दिलें गेलें, तरी कांचेच्या निरनिराळ्या रंगाच्या शिशामधील पाण्यावर सूर्य तेजाच्या प्रकाशानें जो परिणाम होतो त्या पाण्याच्या सेवनानेंहि मोठमोठाले रोग जेव्हां बरें होताना दिसतात तेव्हां सकाळीं स्नान करून अंगीं विद्युत शक्ति आणल्यानंतर सूर्याला अर्घ्य देतांना कांचे सारख्या असलेल्या डोळ्यांवर सूर्य तेजाचा प्रकाश घेऊन उघड्या शरीरावर तेजाचा प्रकाशहि घेणारे अथवा सकाळीं सूर्याला नमस्कार करून त्याचें स्तवन करीत असताना कांहीं वेळ सूर्य तेजाचाच प्रकाश फक्त डोळ्यावरच घेणारे बरेच लोक निरोगी कां असतात? हें समजणें कठीण नाहीं. सूर्यरूपी तेजापासून जगांत वावरणाऱ्यांना आनंद होत असल्या-मुळें हें तेज जर कोणाचें असेल तर तें तेज ईश्वराच्या तेजा शिवाय इतर कोणाचें असूं शकणार? मनुष्यांत जें तेज आहे तें तेज सूर्याच्या तेजाचा अंश असल्यामुळें

मनुष्यांचे तेज अग्नि नव्हे. कारण सूर्याचें तेज अग्निसारखें प्रकाशतें तरी अग्नि नव्हे. अग्नि कृत्रीम असल्यामुळें पाण्याचा स्पर्श झाला कीं अग्नि विझून जातो, परंतु मनुष्यांत असलेलें तेज पाण्याच्या स्पर्शानें विझून जात नाहीं ह्मणून तें तेज नैसर्गिक आहे. आणि हें तेज ज्या तेजाचा अंश आहे तें ईश्वराचें तेज सूर्य रुपानें जगावर प्रकाशणेंहि नैसर्गिकच आहे. म्हणूनच सूर्यरुपी तेज कधींहि विझणें अथवा कोळजून जाणें शक्य नाहीं आणि कृत्रीम असलेल्या अग्निसारखें विझत नाहीं अथवा काळजून जात नाहीं. म्हणूनच तें सूर्यरुपी तेज मनुष्यापेक्षां मोठा असणाऱ्या अशा मूल पुरुषाचें ह्मणजे ईश्वराचें आहे यांत तिळमात्र संशय नाहीं. म्हणून सार्वजनिक अशा ईश्वराची जर प्रार्थना करावयाची झाली तर ती प्रार्थना, आकाशावर असलेल्या पाण्यांत जें ईश्वराच्या तेजाचें प्रतिबिंब सूर्यरुपानें जगावर प्रकाशतें त्या सूर्य नारायणाला, करण्याकरितां त्याला सकाळीं नमन करतांना दोन्ही हात जोडिले म्हणजे मग त्या हातानें दिवसभर चांगलीं कर्मे घडल्याशिवाय कशीं राहणार ? आणि कर्मे करीत असताना ईश्वराचें स्मरण

ठेविल्यानें विशारी दुतोंडी शेषाची परम्परा वाढीस लावणाऱ्या तमोगुणी भोंदूच्या झांपडींत तरी कोण कसा सांपडणार ? ईश्वरापासून जरी चांगले प्रकार झालेले जगांत असले तरी त्याच्याजवळ असलेल्या शेषामुळें वाईटहि प्रकार जगांत आहेतच. आणि म्हणूनच बरें वाईट असें सगळेंच प्रकार जगांत समोर असल्यामुळें मनुष्यांत जी बुद्धि आहे त्या बुद्धीचा उपयोग करूनच मनुष्यांना जें पाहिजे असेल तें ज्यांचें त्यानांच मिळवून घ्यावयाचें असल्यामुळें जगांत सुख आणि दुःख भोगणें जरी कर्मावर अवलंबून असलें तरी भोंदूच्या झांपडींतून सुटका करून घेण्याकरितां ईश्वराचेंही स्मरण फारच उपयोगी आहे, यांत संशय नाहीं. कारण तमोगुणी मनुष्यानें कितीहि रागाचा आवेश आणून वाटेल तितकी कुचेष्टा सुद्धां केली तरी त्या प्रसंगीं जर ईश्वराचें स्मरण केलें तर तमोगुणी कुचेष्टा करणाऱ्यावरच उलट परिणाम होऊन ईश्वराचें स्मरण करणाऱ्यांना दुःख होत नाहीं हें पाहण्यांत येत नाहीं असें नाहीं. असें असल्यामुळेंच अविचारी लोकांपासून विचारी लोकांचें रक्षण करून सत्याचा जय कायमचा टिकविणें हें जें ईश्वराचें ध्येय

सनातन आहे तेंच ध्येय कलंकी अवतारांत सुद्धां भव संदेह नाहींसा करतानाहि राहणार असल्यामुळें जगांत वावरणाऱ्यांचें भवभय समूळ हरण करण्याकरितां पूर्ण समर्थ असणाऱ्या ईश्वराला तूं धन्य आहेस आणि तुझी लीला अगाध आहे! असेंच वारवार म्हणावें लागते. आणि जगांत चालू असलेल्या निरानिराळ्या प्रकारांकडे निरिक्षण केलें म्हणजे किती तरी भीतीदायक प्रसंग जगांत जरी दृष्टोसत्तीस पडतात तरी ते सर्व प्रकार एकमेकांनाच विरोधी होऊन जेव्हां त्यामुळें प्रथम वाटलेली भीति ओघानेंच पुढें नाहींशी होते तेव्हां विश्वजनाचा भव संदेह पूर्ण नाहीसा करणाऱ्या ईश्वराच्या कलंकी अवताराची प्रगट होण्याची वेळ कशी जवळ येत चालली आहे हें लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. असें प्रकार आज जगांत किती तरी घडत आहेत आणि विश्वाच्या मध्यबिंदूपाशीं असलेल्या ठिकाणीं त्याचा प्रत्यक्ष अनुभवहि येत आहे. हिंदुस्थान मूळभूमि असल्यामुळें विश्वाचें तें केंद्रस्थान आहे आणि हिंदुस्थान मध्यप्रांतांच्या ठिकाणीं केंद्रभूत होत असल्या मुळें मध्य प्रांताचा मध्यबिंदू ज्या ठिकाणीं आहे असें

जें फणिंद्रपूर तें विश्वाचें केंद्रस्थान असणें साहजिकच आहे आणि त्या कारणामुळें फणिंद्रपूरांत जे चमत्कार घडतात त्या चमत्कारा कडे पाहिले ह्मणजे ते पटल्या शिवायहि राहत नाहीं. किती तरी प्रसंग त्या ठिकाणीं भीतीदायक वाटले आणि भव भय हरण प्रत्येक वेळीं कसें झालें? त्या चमत्कराकडे जर लक्ष दिलें तर मध्य-बिंदूच्या ठिकाणीं होणारे प्रकार जगाची खात्री करून दिल्याशिवाय राहणार नाहींत हें उघड आहे. ह्मणून विश्वाच्या मध्य बिंदूच्या ठिकाणीं असणाऱ्या फणिंद्रपूरीं जे चमत्कार घडतात त्या चमत्कारांकडें जगांत वावर-णाऱ्यांचें लक्ष असणें साहजिकच आहे आणि त्या ठिकाणीं जे कोठे न घडतील असे चमत्कार घडून प्रथम भीति कशी वाटते व पुढें ती नाहींशी कशी होते हें वर्तमान पत्र द्वारें प्रसिद्ध होत असल्यामुळें घडलेल्या पुष्कळशा प्रकाराबद्दल पुनरोक्ति करण्याची जरूरी आहे असें वाटत नाहीं. असें जगाला हालवून देणारे प्रकार त्याच्या मध्य बिंदूच्या ठिकाणीं प्रत्यक्ष पाहिल्या नंतर मग भीति कसली? आणि भव भयहि हरण झाल्या-शिवाय कसें राहणार? ह्मणून ईश्वरा? तूं कृपाळू आहेस?

आणि आम्हीहि जगांत वावरणारे आपल्या कर्मा प्रमाणें त्यांचीं फळें भोगण्या करितां तयार आहोत असे म्हटल्या वांचून राहवत नाहीं. मग जगाला मिथ्या म्हणून जगाशी फटकून वागणारें आणि जगांत घोंटाळा उडविणारे कांहींहि म्हणोत? अशा प्रकारें ईश्वराची मनो-भावें प्रार्थना करून मी आतां आपल्या लेखाकडे वळ-ण्याची परवानगी घेतां आणि लेखाला आरंभ करण्या पूर्वीं जगांत जर वावरावयाचें आहे तर जगांत धर्म आणि कर्म यांच्या संयोगानें असणारे धर्मानुरुप कर्म श्रेष्ठ अस-ल्यामुळें धर्मा करितां "स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:" या वचनाची जशी आठवण होते त्याच प्रमाणें कर्म करीत असतांना "कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन्" या वचनाची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं.

रच यांत संशय नाहीं. अशा रीतीनें जेथें नैसर्गिक वाढ झाली आणि कृत्रिम वाढ जी करावयाची ती मनुष्यांनींहि केली ह्मणून जग एकसारखें वाढत चाललेलें असल्यामुळें जगांत चोहोंकडे भरभराट झालेली दिसत आहे. अशा प्रकारें सर्व बाजूनें जगाची जरी वाढ होत असली तरी सर्व प्रकारामध्यें विसावा घेण्या करितां जगांत प्रथम स्थान असणें हें जगांत वावरणाऱ्यांना ज्यास्त महत्वाचें वाटत असल्यामुळें अशा प्रत्येक मनुष्याचें लक्ष गृहाकडें असणें साहजिकच आहे. जगाची सुरुवात घरापासूनच आहे. ह्मणून जगांत ज्यांना वावरावयाचे असते ते प्रथम विसांवा घेण्याकरितां स्थळाची व्यवस्था करतात, आणि ती व्यवस्था लागल्यानंतरच इतर गोष्टींकडे त्यांचें लक्ष जातें. ज्याला जगांत घर असेल तोच घराची मर्यादा विश्वापर्यंत वाढवूं शकतो. घरांनीच जगाला शोभा आहे. इतर प्रकारांची जी वाढ होते ते सगळे प्रकार कितीहि चांगले असले तरी घराशिवाय त्यांना शोभा नाहीं. जगांत ज्या ठिकाणीं जंगल आहे तेथें, आणि शहरांत घरें ज्याठिकाणी आहेत तेथें; काय प्रकार आहेत हें पाहिले म्हणजे लहान मोठ्या घराच्या योगानेंच

जगाची शोभा आहे हें पटल्याशिवाय राहत नाहीं. जगांत गरीबांपासून श्रीमंतापर्यंत सर्वांना जर कशाची ज्यास्त आवश्यकता असेल तर ती घराचीच आहे. म्हणून जगांत ज्याला गृह आहे तोच गृहस्थ. मालकीचें गृह असेल तर अशा गृहांत राहणारे गृहस्थ जगांतहि मालकी दाखवूं शकतात. भाड्याच्या घरांत राहणारे तात्पुरते मालक असल्यामुळें तात्पुरते तेहि गृहस्थ असतातच. ज्यांना जगांत मुळींच घर नाहीं ते मात्र जगांतच नसतात. पशूपक्षी सुद्धां विसांवा घेण्यां करितां जागा पाहतात, आणि पक्षी तर आपली घरटीं तयार करून घेतात. मग मनुष्यासारखा जीव जर आपलें गृह करून राहणार नाहीं, तर तो जगांत पशू-सारखा फिरता राहणार तरी किती दिवस? आणि अशा उडाणटप्पुला जगांत गृहस्थ तरी कोण म्हणणार! आणि अशा फिरत्या राहणाऱ्यांनीं कोणी कांहींहि म्हणोत! त्याची जरी पर्वा केली नाहीं तरी त्यांना सुद्धां ते गृहस्थ आहेत, असें तरी गृह असल्याशिवाय कसें वाटणार? गृह असेल तरच गृहस्थ. आणि जे गृहस्थ असतील तेंच जगाची वाढ करणारे असल्यामुळें त्यांचाच जगावर हक्क

आहे. सात्विकवृत्तीची वाढ करणारे साधू जगाशीं संबंध-च ठेवीत नाहींत, म्हणून त्यांची गोष्ट अगदींच वेगळी. परंतु जे साधूंच्या गोष्टी सांगतात आणि जगांत पुन्हां वावरतात त्यांचें मात्र भोंदूत्व बाहेर पडतें, आणि अशा हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवणाऱ्या भोंदूपासून जे आपला बचाव करून घेतात तेच गृहस्थ जगांत आपलीं गृहें संभाळूं शकतात आणि अशा रीतीनें जगांत गृहामुळें गृहस्थ होऊन जगावर हक्क दाखविणारे गृहस्थ आहेत म्हणूनच जगाची वाढ होऊन राहिली आहे आणि तेहि लहान घरें असतील तर तीं मोठीं करून ज्या प्रमाणें घरांची वाढ करतात त्या प्रमाणें जगाला शोभाहि येतेच आहे. ज्यांना घरें नसतील तेहि नवीन घरें बांधून जगाला वाढवितातच. म्हणून जगाची जर वाढ झाली असेल आणि आज होत असेल आणि पूढें होत जाईल तर त्या वाढीला कारण असणारे " गृह आणि गृहस्थच " आहेत असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. जगांत घरांचीं रीठें पडून जग जर उजाड झालें, आणि तेथें जंगल झाला तर ती जगाची वाढ नव्हे. मग अशा ठिकाणीं इतर कितीहि प्रकारांची वाढ झाली तरी तिचा

तेथें काय उपयोग ! ह्मणून जगांत ज्यांना गृहस्थ ह्मणून वावरावयाचें आहे आणि जगांत आपला हक्क कायम ठेवावयाचा आहे त्यांनीं तरी जगांत विसांवा मिळण्याकरितां घराची जरूरी असल्यामुळें जगांत जर प्रथम कशाची काळजी घ्यावयाची असेल तर ती घराचीच आहे हें उघड आहे. अशा प्रकारें जगाची वाढ गृहामुळें होते आणि जगाची वाढ करणारे गृहस्थ आहेत ह्मणून गत वर्षी मी जो " जग आणि जगाची वाढ " या विषयावर लेख लिहिला, त्या लेखानंतर जगाची वाढ होण्यास कारण असणारे " गृह आणि गृहस्थ " हाच विषय जर लेखाकरितां ओघानेंच आला तर त्यांत आश्चर्य कसलें ! आणि मीहि त्याच विषयावर विद्यार्थीदशेंत अभ्यास केल्यानंतर पुढें गृहस्थाश्रमांत घरें बांधण्याच्या कामांतच गेलीं बत्तीस वर्षे अनुभव घेतलेला असल्यामुळें सुज्ञ मंडळींनींहि त्याच विषयावर लेख लिहिण्याची जर मला आज्ञा केली तर त्या संबंधानें मला असलेली माहिती लेखाच्या द्वारें सांगणें मलाहि आनंददायक वाटल्याशिवाय कसें राहणार ! ह्मणून ओघानेंच आलेला सर्व प्रकारें योग्य असा विषय लेखाकरितां

जरी लाभला तरी हा विषय फारच मोठा असल्यामुळें त्या संबंधानें असलेली सविस्तर माहिती एकाच वेळीं सांगणें ग्रंथ विस्तार भयास्तव आणि कांहीं अपरिहार्य कारणामुळें शक्य नसल्यामुळें ठळक ठळक बाबी संबंधानें आणि हटकून जेथें चुका होतात अशा बाबीसंबंधानेंच सध्यां पुरतें सांगणें लेखाच्या मानानें योग्य होईल असें वाटतें. आणि त्या पासून असणाऱ्या आणि होणाऱ्या गृहस्थांना फायदाहि झाल्याशिवाय राहणार नाहीं, अशी खात्री वाटते. विद्यार्थी दशेंत विद्यार्जन करण्याकडें लक्ष असतें. विद्यार्थी दशा संपली कीं पुढील आश्रमास सुरुवात होते आणि त्या आश्रमांत घर मागें लागतें. म्हणूनच तो गृहस्थाश्रम असतो. त्या आश्रमाला सुरुवात झाली कीं असलेल्या घराला वाढवावें कसें ? इकडे लक्ष जातें. घर नसलें तर तें असावें अशी इच्छा होणें आश्रमानुरूप स्वाभाविक असतें. घर बांधावयाचें मनांत आल्या बरोबर घर कसें असावें हें ठरवावें लागतें आणि ऐपती प्रमाणें घराची योजना करावी लागते. घर कोठें असावें हा पुढें विचार आला कीं जागेचा शोध करावा लागतो.

**जागा**:—घराला जी जागा लागेल त्यापेक्षां आजुबाजुनें ऐसपैस जागा मोकळी असावी या हेतूनें जितकी जागा पाहिजे तितकी जागा मिळवावी लागते. ज्याठिकाणीं घर बांधावयाचें आहे ती जागा मुरमाडी अगर कठीण जातीच्या मातीची पाहावी लागते. काळ्या मातीची जमीन टाळावी लागते. कारण काळ्या मातींत घर बांधून ठेवणें ह्मणजे क्षय रोग्याला बाळगण्यासारखें धोक्याचें असतें. क्षय रोग्याची कितीहि काळजी घेतली तरी तो कोणत्या प्रसंगीं आणि केव्हां दगा देईल याचा जसा भरंवसा नसतो, त्याच प्रमाणें काळ्या माती सारख्या धोकेबाज जमीनींत कितीहि पैसा खर्च करून बांधलेलें घर केव्हां दगा देईल याचा नेम नसतो. काळी मातीची जमीन कापूस पेरण्यास च योग्य ह्मणून अशा जमीनीला black cotton soil ह्मणतात. अशी जमीन शेती करितां ठेवून मुरमाडी जमीन घराकरितां पाहणें योग्य असतें. मुरमाडी जमीन शेती करितां आणि काळी जमीन घराकरितां असली तर हें दोन्हीहि प्रकार उलटे आहेत आणि त्यायोगें नुकसानच होते. ह्मणून असे प्रकार न होतील तर तें बरें असतें. तरी पण कांहीं कारणामुळें आणि इतर अडचणीमुळें

काळ्या मातीच्या जमीनीवरच घर बांधावयाचा प्रसंग आला तर त्यालाहि उपाय असल्यामुळें त्याचीहि व्यवस्था करतां येते. आणि अशा ठिकाणीं बांधलेलीं घरें जर काळजी पूर्वक बांधलीं गेलीं तर तीं घरें पुष्कळ दिवस वाचणाऱ्या क्षयरोग्याप्रमाणें टिकतातहि. असें असलें तरी ज्या प्रमाणें क्षय रोग्यांच्या प्रकृतीला फार जपावें लागतें त्याच प्रमाणें अशा घरांना फारच जपावे लागतें. घराकरितां चारी बाजुनें ऐसपैस मोकळी जागा जर न मिळाली तर दोन घरां मधील जागाहि चालते. परंतु समोर आणि मागें थोडी तरी मोकळी जागा असणें जरूरीचें असतें. समोर सडक आल्यास आणि मोकळी जागा ठेवणें शक्य नसल्यास मागें तरी थोडी जागा मोकळी असणें अवश्यक असतें. कारण आंगणा शिवाय कितीहि मोठें घर असेल तर त्याला शोभा नसतें. ह्मणून घर थोडे लहान झालें आणि आंगण असलें तर चालतें. परंतु अंगणाशिवाय मोठें घर उपयोगाचें नसतें. त्या करितां जागा पाहतांना विचार करावा लागतो. जागा ठरल्यानंतर त्या ठिकाणीं घराच्या जागेवर एखादें झाड काढावें लागल्यास झाड मुळ्यासुद्धां काढावें लागतें.

उधईची जागा असल्यास उधईचें मूळस्थान पाहून काढून त्या ठिकाणीं असलेला मूळ किडा जिला मदर अँट म्हणतात तिला काढून टाकल्या शिवाय गत्यंतर नसतें. जागा नक्की करण्याच्या पूर्वी त्या जागेंत दोन तीन ठिकाणीं खड्डे करून कोणत्या जातीची माति जमीनींत कि ती अंतरावर लागते त्याची खात्री करून घेणें जरूरीचें असतें. अशा रीतीनें जागा पक्की ठरली म्हणजे पाया खोदाईचें काम करणें सुरू होतें आणि माल मसालाहि जमा करणें जरूरीचें असतें.

## पाया खोदाई आणि भराई

जमीनीवर घराचा पाया आंखताना तज्ज्ञ मनुष्याची मदत घेणें जरूरीचे असतें. घराचा सामना म्हणजे मुख उन्हाचा आणि पावसाचा त्रास होऊं नये म्हणून पूर्व कडे अथवा उत्तरेकडें ठेवणें अवश्यक असतें. घराचा पाया खोल्या प्रमाणें समांतर हिशेबानें जमीनीवर आंखल्या नंतर तें बरोबर आहे किंवा नाहीं हें कर्णरेषा मोजल्यानें समजतें. पायाची रुंदी जोत्याच्या रुंदी पेक्षां सहा इंच ज्यास्त ठेवावी लागते आणि ही पायाची रुंदी घराच्या वजनाच्या हिशेबानें बरोबर आहे किंवा नाहीं हें पाहणें जरुरीचें असतें.

हिशेबानें पायाची रुंदी जर कमी आली तर जोत्या पेक्षां सहा इंच ज्यास्त असलेल्या रुंदीला कमी करतां येत नाहीं. परंतु हिशेबानें जर ज्यास्त रुंदी आली तर त्या प्रमाणें पायाची रुंदी वाढवावी लागते. मग ती जोत्याच्या रुंदीपेक्षां कितीहि ज्यास्त असो. पायाची मजबुती खोलीवर अवलंबून नसते. पाया दहाफुट आहे असें म्हणणें उपयोगी नसून पाया मरुमावर आहे असें म्हणणें योग्य असतें. जमीनींत मुरुम जर दोन फुटावर लागला तर त्या ठिकाणीं एक फुट मुरुमांत पाया नेणें म्हणजे तीन फुट पाया पुरेसा असतो. मुरुमाची जमीन एक चौरस फुटावर दीड टन वजन सहन करूं शकतें. पिंवळ्या मातीची जमीन एक टन आणि खडक साडेतीन टन वजन सहन करूं शकतो. खडकावर पाया सहा इंच खोल नेणें पुरेसे असतें. पायाची रुंदी जोत्याच्या रुंदीपेक्षां बरीच ज्यास्त हिशेबानें आल्यास म्हणजे चार फुट पायाची रुंदी आल्यास आणि जोता दोन फुट असल्यास जमीनींत असणारी जोत्याची रुंदी वाढवून तिला मिळविणें बरें असतें. म्हणजे सहाइंच खोल अडीच फुट जोता जमीनींत नेऊन त्यांच्या खाली सहा इंच खोल

तीन फुट रुंदीचा जोता नेला म्हणजे चार फुटाच्या पायाला आणि जमीनविर असलेल्या दोन फुटाच्या जोत्यालया तें मिळतें होतें. जितकी पायाची ज्यास्त खोली तितकें ज्यास्त वजन पायावर होत असल्यामुळें जरूरी पेक्षां ज्यास्त खोल पाया नेणें बरें नसतें. ह्मणून तें हिशेबानेंच ठरवावें लागतें. पाया तीन फुटापर्यंत खोल असल्यास चुन्या गिट्टींत ह्मणजे कांक्रीटनें पाया भरणें बरें असतें. ज्यास्त खोल पाया असल्यास एकफुट कांक्रीट वर ठेवून बाकीची खालील खोली बोल्डर्स आणि मुरुम यानें भरून काढणें चालतें. जोता जमिनींत सहाइंच ठेवणें जरूर असल्यामुळें भराई त्या बेतानें जमीनींत खालीं ठेवावी लागतें. काळ्या मातींत पाया करणें झाल्यास फारच सावधगिरी ठेवावी लागत असल्यामुळें आणि त्याला पुष्कळ उपाय असल्यामुळें तज्ञाकडून तें ठरविणें बरें असतें. तरीपण एक मजली घर असल्यास पाया तीन फुट खणून त्यांत बोल्डर्स आणि मुरुम पक्का ठोकल्यानें पाया मजबूत होऊन थोडोशी भीति नाहीशी होते. परंतु हा पाया फक्त भिंती करितां न ठेवतां जेवढें घर असेल तेवढ्या सगळ्या जागेला आणि त्याच्याहि पलि-

कडे चारी बाजूनें पांच फुट ज्यास्त असा हा पाया खणावा लागतो. आणि मग अशा या जमीनींत असलेल्या आणी पक्क्या केलेल्या जागेवर घर आंखावें लागतें आणि जोत्याचें काम झाल्यावर लोखंडी बार सिमेंट मध्यें दिल्यानें भीति बरीच कमी वाटते. दुमजली घर असल्यास भिंतींत सुद्धां सगळ्या भिंतींतून दरवाज्यावर चौफेर लोखंडी बार दिल्यानें घराला मजबुती येते आणि हें एकंदर प्रकार फारच खर्चाचे असल्यामुळें चांगला विचार करून तज्ञाच्या सल्ल्या शिवाय काम करणें बरें नसतें. कारण इतकेंहि करून जोखीम कमी होते असें नाहीं आणि कधीं कधीं इतकेंहि करून भेगा पडतातच आणि भेगा पडल्या म्हणजे मग भेगाच्या ठिकाणीं आडवे दगड अगर फरशी याची पकड देणें ही दुरुस्तीहि जरी घराला मजबुती देते तरी सगळी काळजी नेहमी दूरच होते असें नाहीं. तरी पण कांहींशी काळजी दूर होते आणि काम चालतें. म्हणून काळ्या मातीच्या जमीनीवर घरें बांधतांना फारच सावधगिरी ठेवावी लागते. पायांतून निघणारी माति घराच्या जागेपासून थोड्या दूर अंतरावर टाकणें जरूरीचें असतें आणि कांहीं माति ज्या ठिकाणीं खोल्याची

जागा असेल त्या ठिकाणीं जर टाकली तर ती पाया भरल्या नंतर जोता भरतांना उपयोगी पडते म्हणून अशा ठिकाणीं मधोमध खोल्यांतून टाकण्यासहि हरकत नसते. पाया खोदण्याकरितां आणि पायामध्यें भराई करण्या करितां कसेहि मजुरदार असले तरी ते चालतात. कारण त्या कामाकरितां तज्ञ मनुष्य पाहिजेत असें नाहीं.

घराची योजना:—घरांत जितक्या खोल्या करावयाच्या असतील त्या सर्व खोल्यांत हवा आणि उजेड पुरेसा राहील अशी घराची योजना करावी लागते. छपरीची ऊंची कमीत कमी तरी सहा फुट ठेवावी लागते. आणि ज्या ठिकाणीं पायऱ्या येतील त्या ठिकाणीं डार्मर्स ठेवणें बरें असतें आणि घराला शोभाहि येते. घराच्या मुख्य राहत्या भागाला सोडून बाजूनें लागूनच जर स्वयंपाकाची खोली असली आाण स्वयंपाकघरासमोर असलेल्या छपरींतून येणें जाणें ठेविलें तर राहत्या घरांतील खोल्यांत धुराचा त्रास होत नाहीं. कारण धूर परभारें बाहेरच निघून जातो. आणि स्वयंपाकघरांत आणि राहत्या मुख्य घरांत जी भिंत असते त्या भिंतींत दरवाजा नसल्यानें धूर त्या बाजूनें पसरण्यास

जागाच नसते. स्वयंपाकाच्या जागेवर धुराडें ठेवणें जरूरीचें असतें. धुराडे ठेऊन खिडक्याहि पाहिजे-तच म्हणजे धूर साफ निघून जातो. स्वयंपाकघराच्या बाजूला स्नानाची खोली ठेवावी लागते. स्नानाची खोली जवळपास कोठेंहि असली तरी चालते. शौच्यकुपाची जागा राहत्या ठिकाणापासून आणि स्वयंपाकाच्या ठिकाणापासून थोड्या अंतरावर ठेवणें बरें असतें. आणि ही सर्व योजना जागेच्या विपुलतेवर अवलंबून अस-ल्यामुळें जागेच्या मानानें योजना करावी लागते. तरी पण शौचकुपाची जागा कमीतकमी चारफुट चौरसचौरस असणें बरें असतें.

**कारागीर**:—घराच्या कामाला सुरुवात करतांना कारागीराकडे फारच लक्ष द्यावें लागतें. मजुर-दार कसेंहि असले तरी चालतात परंतु कारागीर जाती-वंत लागतात. दिखाऊ कारागीर उत्तम उत्तम सामान घेऊन ऐटींत येतात आणि ज्यास्त मजुरी घेऊन सुद्धां फटतिंच कामें करून कधीं कधीं कामें बिघडवून जातात. जातीवंत कारागीर जे असतात ते साधे दिसतात परंतु त्यांचें काम चांगलें होऊन मजुरीहि कमी पडते. हल्लीं शिकलेले कारागीर बरेंच मिळतात परतुं ते सर्व देखरेख

करणारेच असतात आणि त्यायोगें काम कसें करावें हेंच सांगणारे पुष्कळ होऊन काम करणारे मात्र मिळत नाहींत. हल्लीं आहे असेंच जर कांहीं दिवस पुढें चाललें तर सांगणारे ज्यास्त होऊन काम करणारे जातीवंत कारागीर मिळणें कठीण जाईल असें वाटतें. कितीहि शिकून कारागीर तयार झाला तरी त्याला दिवसभर उन्हांत बसून घरावर वांसें ठोकणें अथवा विटामातीचें काम करणें किती कठीण जातें हें पाहण्यांत येत नाहीं असें नाहीं आणि त्याच कारणामुळें इतकें ज्ञान संपादन करूनहि असा मनुष्य तीस रुपयावर मिस्त्री होण्याचें कबूल करतो. परंतु शाळेतून न शिकलेल्या अशा घरांतच शिकून तयार असलेल्या जातीवंत कारागीराप्रमाणें त्याला चाळीस रुपये मिळविणें कबूल नसतें. ह्मणून वाटेल त्या जातींतील लोकांना वाटेल तीं कामें शिकवून देखरेख करणारेच वाढविण्यापेक्षां जातीवंत लोकांना जर जातीनुरूप शिक्षण दिलें जाईल तर काम करणारेहि मिळतील आणि कामेंहि व्यवस्थेशीर होतील असें वाटणें साहजिकच आहे. असें होत तों पर्यंत अडचणच आहे. म्हणून कारागीर कामावर ठेवतांना जातीवंत कामें करणारें निवडून लावणें

बरें असतें. नाहींतर जास्त खर्च होऊन पुढें दिखाऊ कारागीरापासून फारच त्रास होतो. मालमसाला खरेदी करतांना स्वत: हाजर राहणें बरें असतें. कारण कारागीरावरच अवलंबून राहणें फारच धोक्याचें असतें. सुतार आणि गवंडी हेंच कारागिर घरकामांत ज्यास्त लागतात.

जोता :—पायाभरणें झाल्यानंतर जोत्याचेंकाम सुरुंकरतांना पाया आखतांना जी मापें घेतलीं असतात त्यामापाच्या हिशेबानें पुन्हां जोता आखणें जरूरीचें असतें. कारण पाया खोदतांना जर कोठें थोडें फार इकडें तिकडें झालें असेल तर तें जोता आखतांना बरोबर दोरीसूत करून घेतां येतें. आणि ठिकठिकाणीं कर्णरेषा मोजून ताळा मिळवून पाहणें त्यावेळीं सुद्धां फारच जरुरीचें असतें. कारण जोता झाल्यानंतर पुढें कोणतीहि चुकी दुरुस्त करणें शक्य नसतें. जोता जमीनींत सहा इंच ठेवून जमीनीवर तीन फुट तरी ठेवणें बरें असतें. तीन फुट जोता ठेवण्यास अडचण असली तर कमीत कमी दोन फुट तरी ठेवणें जरुरीचें असतें. कारण दोन फुटापेक्षां जोत्याची उंची कमी असली तर वळचणी वरून खालीं जमीनीवर पडणाऱ्या पाण्याचे पुन्हां वर शिंतोडे उडण्यानें

घराला ओलावा येण्याची भीति असते. जोता दगडाचा असो किंवा विटाचा असो, चुन्यांत बांधणें जरुरीचें असतें. जोत्याची रुंदी भितीच्या रुंदीपेक्षां साडेचार इंच ज्यास्त ठेवावी लागते आणि हें विटाच्या मापावर अवलंबून असतें. नऊ इंच लांब आणि साडचार इंच रुंद अशा विटा असतील तर दिडफुट रुंदीच्या भिंती करितां एक फुट साडेदहा इंच रुंदीचा जोता लागतो. परंतु आठ इंच लांब आणि चार इंच रुंदीच्या विटा असल्यास दोन विटाची भिंत ह्मणजे एक फुट चार इंच रुंदीची भिंत असल्यास तिला जोता अडीच विटाचा म्हणजे एक फुट आठ इंचाचा लागतो. जोता झाल्यानंतर जोता भराई करणें जरुरीचें असतें.

**जोत्यावरची इमारत**—जोत्यावर इमारतीच्या ज्या भिंती असतात त्या मातींत असल्या तरी चालतात परंतु जेथें लांकूड कामाचा व भिंतीचा सबंध येत असेल त्या ठिकाणीं चुन्याचें काम करणें बरें असतें. तसें न केलें तर मातीच्या योगानें लांकडी काम लौकर सडून खराब होतें आणि लाकडाला डामर फासला तरी त्यापासून व्हावा तसा फायदा होत नाहीं. चुन्याशीं

जेथें संबंध आहे तेथें सुद्धां लांकडाला डामर लावणें बरें असतें. भिंतीच्या खालीं ह्मणजे जोत्यावर दगडी फरशी दिल्यानें उंदराचें भिंती पोकरणें बंद होतें. सगळ्या भिंती चुन्यांत करणें ऐपतीवर अवलंबून असतें. चुन्यांत होणारें काम ज्यास्त मजबूत असतें.

भिंतीचें काम करित असतानाच दरवाज्याच्या आणि खिडकीच्या चौकटी बसवाव्या लागतात. भिंतीची उंची कमीत कमी तरी बारा फुट असणें जरूरीचें असतें.

घराचीभुई:—स्वयंपाकघरांत मातीची भुई ठेवणें बरें असतें. कारण दगडाची फरशी असली तर ती खोली सारवून साफ ठेवितां येत नाहीं. आणि त्या ठिकाणी भांड्यांची आदळ आपट होणें ज्यास्त असल्या-मुळें भांड्यांना पोंचे पडण्याची भीति असते. न्हाणी घरांत आणि जेथें धान्याची खोली असेल त्या ठिकाणीं फरशी दगडाची ठेवावी लागतें. छपरींत आणि जेथें येण्याजाण्याचा मारा ज्यास्त असतो त्या ठिकाणी दगडाची फरशी चालते. घरांत सर्व ठिकाणीं दगडाची फरशी असली तर हिवाळ्यांत भुईवर निजणें धोक्याचें

असते, कारण थंडीच्या दिवसांत दगडाची फरशी थंड असते. फरशी करून मग निजण्याकरितां पलंग आणि खाटा ठेवणें श्रीमंतांना जरी जमत असले तरी कित्येक वेळीं अशा ठिकाणीं सुद्धां पाहुणे मंडळी आल्यास भुईवर बिछाने टाकण्याचा जर प्रसंग आला तर निजणाऱ्यांना फार त्रास होतो. ह्मणून सर्व घरांत फरशी न करितां कांहीं खोल्यांची भुई मातीची ठेवणें बरें असतें. जेवावयास जेथें बसावयाचें असतें त्या ठिकाणीं सारवतां यावें ह्मणून भुई मातीची ठेवावी लागते. दगडाची फरशी लौकर वाळत नाहीं आणि वारंवार धुणेंहि खोलींतून पाणी वाहवतां येत नसल्यामुळें सोयीवार जात नाहीं. छपरी मध्यें उतार असतो ह्मणून फरशी धुतां येते. ह्मणून फरशी कोठें कशी असावी हें विचार करून ठरवावें लागतें. हिंदुस्थानांत तरी भुई संबंधानें काळजीपूर्वक विचार करणें जरूरीचें असतें. जे नेहमी घरांत सुद्धां जोडे वापरतात त्यांनीं जमीन उखरूं नये ह्मणून घरांतून सर्व ठिकाणीं दगडी फरशी केली तरी चालते, परंतु घरांत दगडी फरशी करून मग पायांला गारठा लागतो म्हणून जोडा घालून सर्व घरांतून फिरणें कधीं कधीं रिवाजा

प्रमाणेंच नव्हे तर नैसर्गिक दृष्ट्या सुद्धां पोषक नसतें. इतर जे करतात त्यांना कांहीं होत नाहीं म्हणून सर्वच जर एक सारखेच करावयास लागलें तर तो कृत्रिमपणा कांहींना बाधल्या शिवायहि राहत नाहीं. चुनेगच्ची भुई गारहि असते आणि लौकर उखरते ह्मणून करणें बरें नसतें. घराला ओलावा येण्याचा संभव असल्यास अथवा ओलाव्यामुळें त्रास होत असल्यास चुनेगच्ची भुई आणि दगडाची फरशी करणें हें दोन्ही प्रकार सारखेंच वाईट असतात; कारण ओलाव्यामुळें अशा प्रकारची भुई नेहमी फारच थंड राहते आणि त्यायोगें अराम होतो. मातीच्या भुईवर ओलावा जसा दिसतो तसा चुनेगच्ची भुईवर आणि दगडी फरशीवर दिसत नाहीं तरी एकदम्यानेंच ओलावा नाहीसा न होतां हा गुप्त राहणारा ओलावा ज्यास्त त्रासदायक असतो. ओलाव्याचा त्रास वाचवावयाचा असल्यास जोत्याची भर मुरुम आणि रेति भरून जर घातली आणि त्यावर विटाचे तुकडे आणि विटाच्या कामानंतर राहिलेला चुरा आणि राख टाकून जर भुई चांगली ठोकून तयार केली तर त्यावर केलेल्या मातीच्या भुईला ओलावा येत नाहीं. ह्मणून ज्याठिकाणीं

ओलावा येण्याची भीति असेल त्या ठिकाणीं योग्य तजवीज करणें जरूरीचें असतें. कोणत्याहि प्रकारची भुई केली तरी त्यावर नेहमी खोलीभर असणारी बासाचें चटई काम करणें बरें नसतें.

छत:— कापडी छत टिकाऊ नसतें. देवदारी लांकडाचें छत फुलतें आणि फाटतें ह्मणून अशा प्रकारचें छत फारच काळजीपूर्वक करवावें लागतें. अर्धा इंच जाड सागवानी तक्त्याचें छत महाग असलें तरी टिकाऊपणामुळें परवडतें. ह्मणून सागवानी तक्त्याचेंच छत करणें नेहमी बरें असतें. तक्त्याची रुंदी सहा इंच ठेवणें बरें असतें.

**रूबेराइडचें छत करणें धोक्याचें असतें.**

**छप्पर**:— गवताचें छप्पर जर असलें तर घरांत थंडाई असते. परंतु अशा छपरांत किडे किटुकलें नेहमीं वसाहत करून राहतात आणि आगीची फारच भीति असते ह्मणून गवताचा उपयोग छपरांत करणें बरें नसतें. कवेलूचें छप्पर असलें तर घरांत उष्णता भासते. परंतु ही उष्णता छताच्या योगानें कमी होणें शक्य असल्यामुळें कवेलूचेंच छप्पर एकंदरींत बरें असतें. दुहेरी कवेलू टाकण्यानें उष्णतेपासून बराच बचाव होतो.

हातांनीं केलेलीं गांवठी कवेलूं असलीं तर बासाची चटई टाकून त्यावर कवेलू छावणें बरें असतें. नळीचें कवेलू असल्यास वासाची चटई कवेलू खालीं नसली तरी चालतें. ऐपत असल्यास इतर निरनिराळ्या प्रकारचें कवेलू उपयोगांत आणणें टिकाऊपणाच्या दृष्टीनें चांगलें असतें. लोखंडी टिनाचें छप्पर टिकाऊपणांत ज्यास्त असलें तरी त्यापासून उष्णतेचा फार त्रास होतो ह्मणून तें होतां होईल तों पर्यंत टाळणेंच बरें असतें. गवताच्या छप्पराकरितां एक फुटाला एकच फुट धांव ठेवावी लागतें. कवेलूंच्या छप्पराकरितां दोन फुटाला एक फुट धांव ठेवावी लागतें. कोणत्याहि कवेलूंच्या छप्पराकरीतां दोन फुटाला एकफुट धांव पुरेशी असते. लोखंडी टिनाच्या छप्पराला थोडी धांव असलेली चालते. चुनेगच्ची धाबें जर असलें तर घर थंड राहतें. परंतु चुनेगच्ची धाबें करणें फारच हुशारीचें काम असतें आणि तें काम करीत असताना फारच सावधगिरी ठेवावी लागते. थोडी जर चूक झाली तर सगळें काम फुकट जातें. चुनेगच्ची धाबें करण्याचे प्रकार पुष्कळ आहेत आणि तें खर्चाचें काम असल्यामुळें ऐपतीवर अवलंबून असतें. ऐपती प्रमाणें कोणता प्रकार ठरवावयाचा तो तज्ज्ञाचा सल्ला

घेऊन नंतर ठरविणें बरें असतें. लोखंडी गर्डसंवर चार इंची जाड विटाच्या कमानी करून त्यावर चुनेगच्ची धाबें करतां येतें. लांकडी कामावर अगर लोखंडी टिना वरहि धाबें होतें परंतु तें काम फारच काळजी पूर्वक करावें लागतें. लांकडाला अथवा टिनाला डामर फासून त्यावर लांकडाचा भूसा टाकणें बरें असतें. भूसा टाकल्यानंतर विटाची जुडाई करावी लागते. विटाची जुडाई झाल्यानंतर सहा इंच जाड चुना आणि गिट्टी चांगली मिसळून टाकावी लागते आणि त्यावर पिटाई फारच काळजीपूर्वक करवावी लागते. विटाच्या कमानी-वर टाकलेल्या चुन्या गिट्टीचीहि पिटाई त्याच प्रमाणें करावी लागते. पिटाई चांगली झाल्यानंतर पिटाई केलेली जागा घासून त्यावर सिमेंटचा पातळ हात घोटला तर गच्ची चांगली होऊन पुढें उलत नाहीं. जर काम करण्यांत कांहीं चूक झाली अथवा कामाची हेळसांड झाली तर गच्ची फाटतें आणि त्यामुळें पावसाळ्यांत गळणें सुरूं होऊन फारच त्रास होतो. ह्मणून सगळ्या कामांत हेंच एक काम ज्यास्त काळजीपूर्वक करावयाचें असतें. चुनेगच्ची धाब्याला पाणी खळखळ साफ निघून जाईल असा उतार द्यावा लागतो. राहत्या घरांत मुख्य भागा-वर कवेलू आणि छपऱ्यांवर चुनेगच्ची धाबें ठेवणें चांगलें

असतें. दुमजलें असलेल्या घरांना चुनेगच्ची धाब्याचा फारच उपयोग होतो आणि उन्हाळ्यांत तर निजण्या-बसण्याकरितां त्याची फारच जरूरीहि असतेच. दुमजली घरांत खालील मजला थंड राहतो ह्मणून दुमजली घर चांगलें असतें. दुसऱ्या मजल्यावर छपऱ्या काढणें जमत नसल्यास सज्जा ठेवणें जरूरीचें असतें आणि पावसाच्या त्रासापासून बचाव करून घेण्याकरितां सज्जे ठेवावेच लागतात. सज्जाची रुंदी कमींत कमी अडीच फूट तरी ठेवणें बरें असतें. सज्जावर लोखंडी टिनाचें छप्पर चालतें आणि समोरील बाजू मोकळी ठेवून खांबांच्या मध्यें अडीच फूट उंचीचा कठडा बसवावा लागतो. लांकडी कठडा स्वस्त असतो आणि नक्षीदार लोखंडी कठडे बसविणें ऐपतीवर अवलंबून असतें.

दरवाजे आणि खिडक्या:— दरवाजे आणि खिडक्या आंतील बाजूनें उघडतां येतील असें ठेवून त्यांचें उघडणें आंतील बाजू कडेसच असावें लागतें. दरवाजे कमींत कमी तीन फूट रुंद आणि सहा फूट उंच ठेवणें बरें असतें. मुख्य मुख्य ठिकाणीं चार फूट रुंद आणि सात फूट उंचीचें दरवाजे ठेवणें जरूरीचें असतें. खिडक्या २॥ फूट रुंदीला ३॥ फूट उंच आणि ३ फूट रुंदीला ४ फूट उंच ठेवाव्या लागतात. खिडक्यांची वरील बाजू

आणि दरवाजाची वरील बाजू एका दोरींत ठेवणें बरें दिसतें. बाहेरच्या बाजूनें असलेल्या खिडक्यांना लोखंडी गज देणें जरुरीचें असतें. खिडक्यांना कांच बसविणें उजेडाकरितां चांगलें असतें. बाहेरच्या बाजूनें असणाऱ्या दरवाजांना कांच बसविणें धोक्याचें असतें. कारण कांच फोडून दरवाजा उघडणें बाहेरून सोपें असतें ह्मणून असें दरवाजे दिल्यांचेंच ठेवणें बरें असतें. दरवाजे आणि खिडक्या कब्जावर बसविणें चांगलें असतें. हवाकशी खिडक्या कांचेच्या ठेवून भिंतीच्या आंतील बाजूनें बसविल्यास आंतून त्या उघडण्यास बरें जातें आणि बाहेरच्या बाजूनें वळचणीचा फायदा मिळून पाण्याची ओसाड खिडक्यांतून येत नाहीं आणि त्यायोगें खिडक्यावर सायवान ठेवण्याचीहि जरूरी राहत नाहीं. दरवाज्याच्या चौकटी साडेतीन इंच रुंद आणि साडेतीन इंच जाड असणें बरें असतें. मोठ्या दरवाजाकरितां चार इंचीची चौकट लागते. खिडक्याकरितां तीन इंचीची चौकट लागते. दरवाजाचें आणि खिडक्यांचें लाकूड सागवानी असणें चांगलें असतें. इतर जातीचेंहि लांकूड चालतें. परंतु तें टिकाऊ नसल्यामुळें सागवानी लांकूड उपयोगांत आणणेंच फायदेशीर असतें.

इतर लांकडी कामः— घरांत इतर ठिकाणीं लागणारें लांकडी काम सागवानी ठेवणेंच फायदेशीर असतें. भिंतीला लागूनच खांब देऊन त्यावर मयाली वगैरे बसविणें चांगलें नसून भिंतीवरच मयाली ठेवणें चांगलें असतें. कारण असें केल्यानें भिंतीची छपाई चांगली होऊन लांकडी खांबांच्या योगानें भिंतींत होणाऱ्या फटी ढेकणा करितां तरी चुकविल्यानें एक प्रकारें फायदेशीर होतें. भिंतीवर ज्या ठिकाणी लांकडी काम ठेविलें जातें त्या ठिकाणीं भिंतीवर लांकडावरील वजन सारखें वाटलें जावें ह्मणून चौरस दगडाची फरशी ठेवणें जरूरीचें असतें. लांकडांना जें वजन सांभाळावयाचें असतें त्या मानानेंच त्यांचीं मापें ठरवावयाचीं असल्यामुळें तज्ञाचा सल्ला त्या करितां घेणें बरें असतें आणि त्यायोगें लांकूड कामांत कधीं कधीं बचावहि झाल्याशिवाय राहत नाहीं. नाहींतर भलत्याच ठिकाणीं जेवढ्या मापाच्या मयाली पाहिजेत त्यापेक्षां ज्यास्त मापाच्या मयाली लागून भिंतीवर ज्यास्त वजन वाढतें आणि कारण नसतांना मोठाल्या मयाली लागून व्यर्थ ज्यास्त खर्च होतो. ह्मणून किंमतीनेंहि महाग असलेल्या अशा लांकूड कामांत चौकस राहून काळजीपूर्वक लक्ष देणें फारच जरूरीचें असतें. उपयोगांत येणारें लाकूड सागवानी अथवा बिजासाल जातीचें असतें. लांकडी कामावर किती वजन पडलें

असतांना कोणत्या मापाचें लांकडी काम असावें त्याचा थोडा तरी अंदाज समजावा ह्मणून हिशेब करणें बरें वाटतें. घराची रुंदी चौदा फुट आहे आणि तुळई सहा फुट अंतरावर आहे तर त्या तुळईवर वजन खालील प्रमाणें येतें. तुळईवर ज्या प्रकारचें काम असेल त्याचें वजन काढावें लागतें आणि तें वजन जर दोनशे पौंड असले तर तुळईवर वजन (१४×६×२००)= १६८०० पौंड येतें. हें जें वजन आलें त्याला लांबीनें दोनदां गुणून ३२०नें भागावें ह्मणजे जें उत्तर येतें त्यांचें दिडपट करून त्याचा वर्गमूळ काढावा आणि जें उत्तर येतें त्याचा पुन्हां वर्गमूळ काढावा म्हणजे तुळईची उंची समजते. ह्मणजे वर दिलेल्या आंकड्या वरून $\sqrt[४]{१॥ \times (१६८०० \times १५ \times १४ \div ३२०)} = ११$ इंच उंची येतें आणि त्या उंची वरून रुंदी काढावयाची ह्मणजे उंचीला दिडानें भागून रुंदी समजतें ह्मणून वरील हिशेबा प्रमाणें साडे सात इंच रुंदी येते. आणि अशा प्रकारें १४ फूट रुंदीच्या खोलीला जर तुळई ६ फूटाच्या अंतरावर असली आणि त्यावर वजन १६८०० पौंड असलें तर ती तुळई साडे सात इंच रुंद आणि अकरा इंच उंच अशी असली म्हणजे चालते. हें सागवानी लांकडांकरितां माप आहे. बिजासाल जातीचें

लांकूड असल्यास वरील हिशेबांत जेथें ३२० नें भागिलें आहे त्या ठिकाणीं ३३० नें भागावें लागतें. अशा प्रकारें जरी हिशेब असला तरी तज्ञाला विचारून घेणें बरें असतें. आणि ज्यांना थोडी बहुत त्याची जाणीव आहे त्यांना उपयोग व्हावा म्हणून वजन काढण्या करितां कोष्टकेंहि शेवटीं दिलेलीं आहेत. सगळें लांकडी काम म्हणजें कैच्या, तुळई, कड्या, वांसे, बत्ते वगैरे यांचीं मापें हिशेबानीं ठरवावींत. परंतु छपरींत असलेल्या खांबाला मात्र चार इंची चौरसच ठेवावें लागतें. कमींत कमी आणि जवळ जवळ म्हणजे पांच फुटाच्या अंतरा-वंर खांब जर असले तर साडे तीन इंचीचे खांब ठेव-ण्यास हरकत नसतें आणि कवेलू खालील बत्याचें माप हिशेबानें कमी आलें तरी ते १। इंच ×१॥ इंच ठेवणें जरूरीचें असतें. अखेरचे वळचणी जवळील बत्ते १॥ इंच ×२॥ इंच ठेवावे लागतात.

छपाई, दरजबंदी आणि सफेदीः —

बाजारू साध्या विटाला पाण्याच्या माऱ्यापासून नुकसान पोहचूं नये म्हणून बाहेरच्या बाजूनें छपाई करावयाची ती चुन्याची करावी लागते आणि आंतून मातीची छपाई केलेली चालते परंतु चुन्याची छपाई केली तर ती चांगलीच असते. उत्तम विटा असल्यास बाहेरून दरजबंदी करणें बरें असतें परंतु आंतून चुन्याची

छपाई लागते. चुन्याची छपाई करताना पिटणी चांगली करावी लागते आणि पाण्याचा मारा चांगला करावा लागतो. आंतून सफेदी आणि बाहेरून रंग देणें बरें असतें.

## तेलपाणी, व्हारनिस आणि रंग

लांकडी कामाला रंग देणें चांगलें असतें. ऐपत नसल्यास तेलपाणी दिल्यानेंहि चालतें तरीपण जेथें पाण्याचा मारा असेल त्या ठिकाणीं रंग देणें जरूरीचें असतें. दरवाज्यांना आणि खिडक्यांना रंग देणें बरें असतें आणि जेथें पाण्याचा मारा असेल तेथें व्हारनिसही चांगलें असतें. मातीचा आणि लांकडाचा जेथ संबंध येतो त्या ठिकाणीं लांकडास डामर लावणें जरूरीचें असतें.

किरकोळ:—— वांस्यांना पान लावणें बरें असतें. लोखंडाला डामर लावावें लागतें. टिनाचा मातीशीं अगर चुन्याशीं संबंध येत असल्यास त्या टिनाला डामर लावावा लागतो. चुन्याच्या कामावर पाण्याचा मारा चांगला करावा लागतो. घराच्या आजूबाजूनें पक्क्या नाल्या करणें जरूरीचें असतें. घरांत ठिकठिकाणीं मोऱ्या कार्यप्रमाणें कराव्या लागतात. न्हाणीं घरांत जमीनी पासून पांच फूट उंच आंतील बाजूनें सिमेंटची छपाई करावी लागते. स्वयंपाकघरांतील भिंती पांढऱ्या मातीनें

सारवणें बरें असतें. घरांत मागील बाजूस अंगण असल्यास तेथें फरशी केल्यास चालतें. परंतु फरशी शेवाळून घसरड होऊं नये म्हणून तिला नेहमीं घासावी लागते. अंगण मोठें असल्यास मुरुम आणि रेति टाकून ती जागा पक्की करणें चांगलें असतें. विटा घेतांना त्या पाण्यांत टाकून पाहणें जरूरीचें असतें. कवेलूं सुद्धां पाण्यांत टाकून पहावें लागतात. पाण्यांत विरघळणारे कवेलूं आणि विटा कच्च्या असतात. लांकूड कामांत कच्चें लांकूड पाहावेंच लागतें तरी तें वाजून पोकळ आहे कीं काय ! हें फार सावधगिरीनें पाहावें लागतें. कारण पोकळ जागेंत लांकडाचा डूच देऊन बेमालूम अशा मयाली नेहमी बाजारांत असतात. इतर माल मसाला अंदाजानें किती लागतो हें हिशेबानें काढून मग जमा करणें बरें असतें.

अशा प्रकारें घरें बांधतांना निरनिराळ्या प्रकाराकडे आणि सामान सुमानाकडें लक्ष देणें जरूरीचें असतें. हें सर्व प्रकार साधारण घरें बांधतांना सुद्धां असतात. ऐपती प्रमाणें मोठालीं घरें श्रीमती थाटाची असल्यास ज्यास्त किंमतीचा सामान लावून घरांना जितकी शोभा ज्यास्त आणावयाची असेल तितकी ज्यास्त शोभा आणतां

येते. गरीबी थाटाचीं घरें बांधावयाचीं झाल्यास कमी किंमतीचें सामान लावूनहि भागतें. घरें बांधणें ऐपतीवर अवलंबून असल्यामुळें फारच सावध राहावें लागतें. एका तज्ञाचा सल्ला घेतल्यावर मग दुसऱ्याला विचारणें प्रथम बरें असतें परंतु काम सुरू झाल्यावर दोन तज्ञांची देखरेख नुकसानीस कारण होतें. तज्ञा शिवाय इतर मंडळीहि येणारे बरेंच असतात. प्रकृति चांगली असून सुद्धां कांहीं मंडळी कांहीं तरी सांगून जसें एखाद्याला संशयांत घालतात आणि आजारी मनुष्यांना तर भेडावून सोडतात याच प्रमाणें घरें बांधतांना प्रत्येक जण आपलेंच कांहीं तरी सांगून अगदीं भेडावून सोडतात आणि त्या योगें घराच्या कामाला बरीच हरकत येते. इतर सर्वच मंडळींना खर्चाची किंमत नसल्यामुळें त्यांच्या सुचना जरी चालू असतात तरी घरें बांधणाऱ्यांना तें कितपत झेपेल हें पाहून सांगणारे मिळेतोंपर्यंत काय करावयाचें हें ठरविणें बरें नसतें. असलेलें घर जर सुधारावयाचें असेल तर घरवाल्यांना अगदीं वेडावून सोडतात आणि कोणाचें ऐकूं आणि कोणाचें न ऐकूं असें त्यांनाहि होऊन जाते आणि आजारी मनुष्या प्रमाणें भांबावून जाण्याचाहि प्रसंग येतो. म्हणून ज्यांना घरें दुरुस्त करावयाचीं अस-

तात अथवा नवीन घरें: बांधावयाची असतात त्यांना इतर लोकांपासून फारच सावध रहावें लागतें. ज्याच्या हातांत घरांतील कारभार असतो, त्याच्यावर घराची फारच जबाबदारी असते. त्यानें कशीहि व्यवस्था केली तरी त्याला घरांतील इतर कांहीं मंडळी तरि नांवे ठेवण्यास कमी करीत नाहींत. सर्वांच्या मता प्रमाणें कारभार होणें बरें असतें, परंतु भिन्न प्रकृतीमुळें सर्वांचें एकमत होणें कधीं कधीं जेव्हां शक्य नसतें तेव्हां ज्याच्या हातांत कारभार असतो त्याला फारच सावधगिरीनें वागावें लागतें आणि कोणी विरोध केल्यास त्याचा विरोध सहन करण्यांत त्याला मोठी हिम्मतच दाखवावी लागते. घरांतल्या घरांत जर असे प्रकार घडतात तर बाहेरच्या मंडळींशी सामना करणें जगांत किती तरी सावधगिरीचें काम असतें. जो तो ह्मणणार असें कां केलें ! आणि असें केलें तर बरें. त्या पंचायतींत एकदां मनुष्य पडला कीं त्याचें कामच झालें. कारण त्याला कितीदां तरी केलेलीं कामें पुन्हां करवून द्यावीं लागतात. ह्मणून मनाचा घट्टपणा पाहिजे. कोणी कांहीं हि ह्मणो ! आह्माला अशीच सोय पाहिजे म्हणून आम्हीं असें केलेंहि असें म्हणणें ह्मणजे इतरांचें तोंड बंद केल्या

सारखेंच होतें ह्मणून असा जबाब देऊन त्यांना मुकाट्यानें परत लावण्यास मनाचा मोठी हिम्मतच करावी लागते. उत्तर सोपें आहे परंतु मंडळी खमंग असतात आणि थट्टे खोरांची जर गांठ पडली तर हें सोपें असलेलें असें उत्तर त्यांना देण्यांतहि हिम्मतच लागते. ह्मणून घर बांधतांना हिम्मत ठेवावी लागते आणि तर्कशास्त्र आणि अर्थ शास्त्र यांच्या सुद्धां भरंवशावर न राहतां जे सामान लागेल ते चांगले आणण्याकडेहि मनाचा मोठपणा दाखवावा लागतो. कारण कमी किम्मतीचे सामान अर्थ-शास्त्र दृष्ट्या फायदेशीर असतो परंतु टिकाऊपणांत कच्चे असल्यामुळें त्यापासून जसें नुकसान होतें त्याच प्रमाणें दोन रुपयाप्रमाणें रोज घेणाऱ्या पेक्षां दिडरुपया रोजाचा सुतार अर्थशास्त्र दृष्टीनें जरी फायदेशीर असला तरी कामाच्या दृष्टीनें फायदेशीर नसतो. म्हणून घराचें काम करीत असतांना हिम्मत ठेवावी लागते आणि सोयी करतांना आपणास जशा सोयी पाहिजेत तशाच त्या करवून घ्याव्या लागतात. घरें बांधतांना देशकाल वर्तमान पाहून जशी व्यवस्था करावी लागते त्याच प्रमाणें रिवाजालाहि धरून कांहीं सोयी कराव्या लागतात.

कारण एक प्रकारची व्यवस्था सर्व ठिकाणीं सारखीच सर्वांना लागू पडत नसते. थंड प्रदेशांत स्वयंपाक घर राहत्या घरापासून थोडें दूर असलेलें चालतें, परतु शौच्य कुपाची जागा अगदीं निजण्याच्या खोलीजवळ ठेवावी लागते. उष्ण प्रदेशांत थंडीपासून त्रास होत नसल्या-मुळें पाण्याच्या उपयोगानें होणारी घाण टाळण्याकरितां शौच्यकुपाची जागा राहत्या घरांपासून थोड्या अंतरा वरच असणें बरें असतें. ज्या स्वयंपाकघरांत मांसाहार तयार केला जातो ते स्वयंपाकघर राहत्या ठिकाणा-पासून दूर ठेवावें लागतें. ज्या स्वयंपाक घरांत धान्याहार तयार केला जातो तें ठिकाण राहत्या ठिकाणापासून जवळ असलेलें चालतें. घरांत ठिकठिकाणीं उजेडा करितां आणि हवेकरितां खिडक्या आणि दर-वाजे ठेविले असले तरी कोणत्या प्रसंगी किती उजेड पाहिजे आणि केव्हां किती हवा पाहिजे हें पाहिल्या-शिवाय सर्व खिडक्या नेहमीं उघड्या ठेवणें बरें नसतें. कारण चुकून सर्वच खिडक्या उघड्या ठेविल्या गेल्या तर कधीं कधीं ज्यास्त हवा मिळाल्यामुळेंहि नुकसान झाल्याशिवाय राहत नाहीं. साधारणपणें खिडक्या

आणि दरवाजे मिळून माणसीं दहा फुट चौरस या हिशेबानें जागा असल्यास ती पुरेशी होते. कोंदट हवा मिळाल्यानें जसें नुकसान होतें त्याचप्रमाणें पाहिजे त्या पेक्षां ज्यास्त हवा मिळाल्यानेंहि नुकसान होतें. हिंदुस्थानांत तर ह्या सोयीसंबंधानें ऋतुवार काळजी पूर्वकच पहावें लागतें.

उन्हाळ्यांत ज्यास्त मोकळी हवा रात्रीं पाहिजे असते म्हणून आंगणासारखी मोकळी जागा चांगली असते आणि हिवाळ्यांत कमी हवा पाहिजे म्हणून खिडक्या बंद कराव्या लागतात. नाहींतर निजणारा कधीं कधीं ज्यास्त थंड हवा लागल्यास आकडून जातो. तरी पण हे प्रकार प्रत्येक मनुष्याच्या प्रकृतीवर अवलंबून असल्यामुळें प्रत्येकाला आपल्या सोयीप्रमाणें राहावें लागते. आणि इतर करतात म्हणून तसेंच करावयास जाणें नुकसानीसच कारण होतें. खाणें पिणें आणि राहणें यांतच मनुष्याचें जीवन आहे. म्हणून खाण्यापिण्यांत ज्या प्रमाणें हट्ट करणें चांगलें नसतें त्याच प्रमाणें राहण्यांतहि हट्ट करणें चांगले नसतें. त्याच कारणामुळें राहत्या घरांत ज्या सोयी लागतात त्या त्यांच्या चालीरीतीप्रमाणें ठेवणें जरूरीचे

असतें. पूजा करणारे असल्यास देवघर लागतें. सोंवळें वाळगणारे असल्यास दांड्या लागतात आणि सोंवळ्याचा सामान ठेवण्यास स्वतंत्र खोली ठेवणें बरें असतें. घरांतून आंतील बाजूनें ठिकठिकाणी खुंट्या ठेवणें जरूरीचें असतें. श्रीमंताच्या महाला पासून गरीबाच्या झोपडीपर्यंत सर्व ठिकाणी ज्या सोयी कराव्या लागतात त्या राहणाऱ्यांच्याच सोयीप्रमाणें कराव्या लागत असल्यामुळें जशी काळजी घ्यावी लागते त्याचप्रमाणें निरनिराळ्या जातीच्या लोकांच्या चालीरीतिप्रमाणेंहि हिंदुस्थान सारख्या देशांत प्रत्येक ठिकाणी निरनिराळें प्रकार नैसर्गिक असल्यामुळें नैसर्गिक दृष्ट्या पोषक असतील अशा सोयी करण्याची काळजी घ्यावी लागते. आणि वैद्यकी शास्त्राच्या दृष्टीनें जर खाण्यापिण्यांत काळजी घेतली जाते तर राहण्याकरितां असणाऱ्या घराची काळजी घेतल्याशिवाय जगांत कसें राहतां येणें शक्य असणार ! आणि मांसाहारी मनुष्यांना धान्याहारी होणें जर वैद्यकी शास्त्राच्या दृष्टीनें सम्मत नाहीं तर धान्याहारी लोकांना मांसाहार अपायकारक झाल्याशिवाय तरि कसा राहणार ! आणि भिन्न प्रकृतिमुळें व खाण्या

ण्याणांत भिन्न प्रकार असल्यामुळें राहण्यांतहि निरनिराळ्या सोयी ठेविल्याशिवाय कसें चालणार ! मांसाहारी मनुष्यांना धान्याहार करणें वैद्यकी शास्त्राच्या दृष्टीनें सम्मत नाहीं हें खालील उताऱ्यावरून सिद्ध होत असतांना मग धान्याहारी मनुष्यांनाहि मांसाहार करणें कसें सम्मत होणार ?

"Following the example of some classes of Natives, and abstaining from meat diet altogether, is not desirable. The custom of ages has habituated the Hindoo to taking large quantities of rice with pulses or corn; but a European would not digest this diet. Its bulk alone would prevent perfect digestion, even if aided by the large amount of condiments taken by the Native; which, in the unaccustomed stomach of the European, would also induce indigestion."

Page 604 of the Manual of the Family Medicine and Hygiene for India by Sir William Moore K. C. I. E.

ह्मणून नैसर्गिक दृष्टया पोषक असतील असेंच प्रकार

खाण्यापिण्यांत आणि राहण्यांत जरूरीचें असल्यामुळें नैसर्गिक असलेल्या अशा जन्मसिद्ध हक्कान्वयेंच त्याचें पालन ज्या जगांत वावरणाऱ्या लोकांकडून काळजी पूर्वक होतें त्या लोकांना गृहस्थ ह्मणणें कोणालाहि पटल्याशिवाय राहणार नाहीं. आणि त्यांत मुख्यत्वेंकरून गृहांचें महत्व असल्यामुळें आणि गृहामुळेंच गृहस्थ जगांत वावरत असल्यामुळें जगाची वाढ होण्याकरितां गृहाचेंच महत्व आहे हेंहि पटल्याशिवाय राहत नाहीं. ह्मणूनच खाण्यापिण्यांत आणि राहण्यांत निरनिराळें प्रकार नैसर्गिक असल्यामुळें त्या प्रकारांत समताहि राहिलीच पाहिजे, असें ह्मणणें नैसर्गिक दृष्ट्या पोषक नसल्यामुळें त्यासंबंधानें हट्ट धरणें अविचाराचें झाल्याशिवाय राहत नाहीं आणि अविचार झाल्यामुळें अंतीं जरी दुःख भोगावें लागलें तरी जगाची वाढ होत असल्यामुळें अशा लोकांनासुद्धां जगाबरोबर फरफटतच जावें लागणार यांत संशय नाहीं. असें प्रकार असल्यामुळें जगांत वावरणारे जगाकडे जेव्हां लक्ष देतात तेव्हां त्यांना जगांत कितीहि भीतिदायक प्रसंग दृष्टोत्पत्तीस पडले तरी ते प्रसंग एकमेकांनाच विरोध करताना दिसले

ह्मणजे त्यायोगेंहि आपोआपच भीति कशी नष्ट होते! हें लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. ह्मणूनच जग वाढीस लागलेलें आहे. आणि ती वाढ गृहस्थांकडून होत असल्यामुळें गृहांच्या योगानेंच जगाची वाढ होत आहे आणि गृहांची वाढ होणें ऐपतीवर अवलंबून असल्यामुळें ऐपत वाढविणारा कर्मयोग जगांत श्रेष्ठ आहे यांत संशय नाहीं. ह्मणून जसें कर्म तसें फल मिळत असल्यामुळें जगांत सुख व दुःख भोगण्यांत समता नाहीं हें जर पटल्याशिवाय राहत नाहीं तर जगांत वावरतांना सतत चांगलीं कर्मे करतां यावींत ह्मणून कर्में करण्याकरितां अंगांत जी शक्ति लागते त्या शक्तीची वाढ करणें आणि तिला जपणें नैसर्गिक असलेल्या पिंडाच्या वाढीवर अवलंबून असल्यामुळें पिंडाला नैसर्गिक दृष्ट्या पोषक असतील अशा प्रकारच्याच खाण्यापिण्याची आणि राहण्याची काळजी घेणें ज्या स्वधर्मावर अवलंबून आहे त्या स्वधर्मानुरूप जन्मसिद्ध हक्काचें पालन करण्यांत समता ठेवण्याकरितां एकाच प्रकारचें खाणेंपिणें आणि राहणें सर्वांना शक्य नाहीं हें पटल्याशिवाय कसें राहणार ? आणि हें पटत नाहीं असें ह्मणण्याचें धाडस करणारे जगांत जे वावरतात त्या

गृहस्थांत तरी कोणी असतील असें संभवतच नाहीं. म्हणून ज्यांचा जो धर्म नैसर्गिक असेल म्हणजे ज्या धर्मात जन्म झाला असेल त्यांना तो स्वधर्म म्हणून चांगलाच आहे आणि ज्यांच्याकडून चांगलीं कर्मे घडतात त्यांचा मान जगांत झाल्याशिवाय राहतहि नाहींच. आणी हे प्रकार भिन्नविचार असलेल्या अशा गृहस्थांकडूनच जगाच्या रहाटीप्रमाणें होतात असें नाहीं, तर सर्व एक सारखेंच सुखी असावे असें म्हणून समतेचें ध्येय प्रतिपादन करणारे सुद्धां चांगलीं कर्मे करणाऱ्यांचा सन्मान करून आपल्याच ध्येयाच्याहि विरुद्ध गेल्याशिवाय राहत नाहींत. जगांत निरनिराळे प्रकार असल्यामुळें मागें पुढें राहणाऱ्या घड्याळाप्रमाणें सर्व मंडळींचें एकमत सतत एक सारखेंच राहणें जरी शक्य नसलें तरी सर्व घड्याळीं बाराच्या ठोक्याला जशी रोज बरोबर केली जातात त्याच प्रमाणें भिन्न विचार असलेल्या सर्व मंडळींचें एकमतहि खाण्यापिण्याची बाराचीच वेळ साधून देणाऱ्या अशा कर्मयोगाचेंच ठिकाणीं असतें. म्हणून घड्याळीं लावण्याकरितां बारा वाजल्याबरोबर जसें किल्ली देण्याकडे लक्ष असतें, त्याचप्रमाणें जगांत वावर-

णाऱ्यांचेंहि सर्व लक्ष कर्मयोगाकडे असतें. मग इतर बाब-तींत त्यांच्यांत कितीहि मतभेद असोत ! आणि इतर वेळीं ते घड्याळाप्रमाणें कितीहि मागेंपुढें राहोत ! आणि ज्यांना सरळ रीतीनें मन मोकळें करून कांहीं सांगा-वयाचें असतें, त्यांनाहि तसें जगांत सांगताहि येतें. कारण कांहींनां खुष करण्याच्याच फक्त हेतूनें तें सांगा-वयाचें नसल्यामुळें थोड्याशा पैशाच्या लोभाकरितां त्यांना आपले विचार दडवूनहि ठेवण्याचें कारण राहत नाहीं. ह्मणूनच जग चाललें आहे आणि वाढीस लागलेलें आहे. आणि जगांत जंगलाचें ऐवजीं गृहांची वाढ होऊन गृहामुळें गृहस्थ सरळरीतीनें जगांत वावरतहि आहेतच. अशा गृहस्थांना विद्यार्थी दशेंत जी विद्या त्यांनीं संपादन केली त्या कर्माप्रमाणें प्राप्त झालेल्या फलानुसार विद्येला कायम ठेवून गृहस्थाश्रमांत कर्म करीत असतांना इतरांनीं संपादन केलेल्या आपल्याच विद्येची आणि त्या विद्येला अनुरूप असलेल्या कर्माची कितीहि तारीफ केली तरी त्या कर्माबद्दल माहिती नाहीं असें ह्मणणें जसें कमीपणाचें वाटत नाहीं तसेंच नैसर्गिक दृष्ट्या पोषक असेल असेंच खाणें पिणें आणि राहणें ठेवीत असतांना इतरांनीं

आपल्याच खाण्यापिण्याची आणि राहण्याची कितीहि तारीफ केली तरी ते प्रकार नैसर्गिक दृष्ट्या पोषक नाहींत असें म्हणणें कमीपणाचें वाटत नाहीं. आणि असें सरळ रितीनें सांगण्यांतच स्वधर्माचें रहस्य असल्यामुळें जगांत गृहस्थांना तरी स्वधर्माचें महत्व वाटल्याशिवाय राहत नाहीं. कांहीं चांगले प्रकार तर कांहीं वाईट प्रकार सर्व ठिकाणीं असतातच. आणि सर्व ठिकाणीं सर्वच चांगलें राहणें केव्हांहि शक्य नसल्यामुळें निरनिराळ्या धर्माची तुलना सुद्धां करण्याची अवश्यकता वाटत नाहीं आणि हें ज्या मानानें पटत जातें त्या मानानेंच भवसंदेहहि फिटत जातो यांत संशय नाहीं. अशा प्रकारें भव संदेह ज्या मानानें फिटत जातो त्या मानानेंच विषारी दुतोंडी तमोगुणी शेषाची परम्परा वाढविणाऱ्या राक्षस गणांकडून जगांत उत्पन्न होत असलेल्या भोंवऱ्यांतून बचावहि होत जातो आणि त्यायोगें भोजन ताटांतील वादळापासूनच नव्हे तर चहाकपांतील वादळापासून सुद्धां वाटणारी भीति नाहींशी झाली म्हणजे सर्व प्रकारच्या लोकांना भिन्न प्रकृतीमुळें नैसर्गिक दृष्ट्या पोषक असलेल्या अशा एकाच खाण्या

पिण्याच्या प्रकारानें ह्मणजे फलाहारानें आणि दुग्ध प्राशनानें प्रेमाची वृद्धि करतां येतें. ह्मणूनच जगांत वावरणाऱ्या अशा गृहस्थांत कधींहि भांडणें होत नाहींत. आणि ज्यांना भांडावयाचेंच आहे त्यांना आईबाप सुद्धां पुरत नाहींत, मग इतरांची काय कथा ! आणि भांडण्याकरितांहि कारणांना काय कमी ! अशा प्रकारें जग चाललें आहें. आणि वाढीस लागलेलें आहे आणि त्या वाढीला कारण गृहस्थ आहेत यांत संशय नाहीं आणि जे जगाला मागें ओढण्याचा प्रयत्न करतात त्यांनाहि शेवटीं जगाबरोबरच पुढेंच जावे लागते हेंच चक्षुर्वैसत्यं दृष्टोत्पत्तीस पडत असल्यामुळें पटल्याशिवाय राहत नाहीं. मग मनाला जें सत्य वाटेल तेंच सत्य आहे असें ह्मणून कसें चालेल, आणि सत्य तत्वें ठरलेलीं असल्यामुळें "मनःपुतं समाचरेत्" याची दाद जगांत तरि कशी लागणार ? आणि हे प्रकार जगांत जर होणें शक्य नाहीं तर तें ईश्वराला तरि कसें रुजूं होणार?

सध्या पुरतें कांहीं अपरिहार्य कारणामुळें या विषया संबंधानें इतकेंच सांगून ज्या श्री नर्मदामाईच्या कृपेनें विचारास वळण लागलें आणि लेख लिहिण्याची स्फूर्ति झाली

त्या जागृत देवतेला नमन करून "हर नर्मदे, हर, हर, महादेव" ह्मणून श्री सच्चिदानंद महाराज वडगांवकर यांच्या प्रेरणाज्ञेनें हा नववा लेख श्री शिवार्पण करण्याची परवानगी घेतों.

गत वर्षी "जग आणि जगाची वाढ" या विषयावर लेख लिहिल्यामुळें जगाच्या मध्यबिंदूस्थानीं असलेल्या अशा फणींद्रपूरीं कितीतरी भीति दायक प्रसंगापासून भवभय हरण होऊन त्यायोगें भव संदेह नाहीसें होण्या सारखे प्रकार घडलेले दिसले आणि जगांत वावरणाऱ्यांनाहि स्वधर्माची आणि कर्माची ओळख पटून आपलें घर सांभाळण्याकडें त्यांची प्रवृत्ति झालेली दिसली. तसेंच नवें वर्ष बंधु-भगिनींना मुला-बाळांना, आणि सर्वत्र मंडळींना सुखाचें जाऊन त्यांचा भवसंदेह फिटत जावो! आणि त्यांच्याकडून गृहस्थाश्रमाला योग्य असें वर्तन घडून ते जगाच्या वाढीसच कारण होवोत! अशी मागील वर्षाप्रमाणेंच यंदाहि वत्सरारंभाच्याच सुमुहूर्तावर ध्वजारोपण प्रसंगीं ईश्वराची निरंतर प्रार्थना

करणारा आणि ईश्वर स्वरूपीं असलेल्या वृंद मंडळीपुढें हा लेख नम्रपणें सादर करणारा,

आपला कृपाभिलाषी,


**गोविंद रंगराव अळेकर**

चैत्र शुद्ध १ शके १८४६ संवत १९८०.
रोज शनवार तारीख ५ एप्रिल १९२४.

समाप्त

---

टिप:—घरें बांधतांना ज्या कोष्टकांची जरूरी पडते अशी कांहीं कोष्टकें आणि गृहस्थाश्रमांत लागणारी इतर कांहीं कोष्टकें आजि किरकोळ माहिती या लेखाका जोडलेली आहे तिकडे लक्ष द्यावें.



# कोष्टकें आणि किरकोळ माहिती

( १ ). पिवळ्या मातीची जमीन पायाकरितां एका चौरस फूटावर एक टन वजन सहन करूं शकते. मुरुमाची जमीन दीड टन आणि खडक साडेतीन टन वजन सहन करूं शकते.

( २ ). एक घनफूट कामाचें वजन. ( पौंड ). विटाचें काम १२०, दगडाचें काम १५६, गिट्टी आणि चुना (कांक्रीट) ११५, चुन्याची छपाई १०६, लांकूड सागवानी काम ५२, साळईचें लांकूड काम ६२, कच्च्या विटामातींत १००, माति १३०, रेति १२५.

( ३ ) एक घनफूट मालाचें वजन. (पौंड). सोनें १२०४, चांदी ६५३.८, लोखंड ४५१, शिसें ७०८.५, पोलाद ४९०, टीन ४५५, झिंक ४३७, पितळ ५५२.४, कोळसा ९५, सिमेंट ९०, जवसाचें तेल ५८, पाणी ६२.४२५, बर्फ ५७.८.

( ४ ). छपरावर हवेचा दाब. एक चौरस फूटावर (पौंड). धांव एकालाएक ५४, धांव तिनाला दोन ४२, धांव दोनाला एक ३५, धांव तिनाला एक २५. एक चौरसफूट कामाचें वजन. (पौंड). टिन २, मोठे कवेलूं दुहेरी ३४, मोठें कवेलूं एकेरी १७, साधे आणि नळीचे कवेलूं १४, नऊ इंच गवताचें काम १०.

( ५ ). आवारा करितां तार ३१० यार्ड अथवा ९३० फूट लांबीचें वजन एक हंडरवेट असतें. ताराचा भाव हंडरवेटावर असतो.

( ६ ). २० B.W.G. ६ फूट लांब आणि २६ इंच रुंद टिनाचें वजन २४ पौंड. ६ फूट लांब आणि ३२ इंच रुंद टिनांचें वजन २८.५ पौंड. १८ B.W.G टिनाचें वजन अनुक्रमे ३१ आणि ३६ पौंड. २० B.W.G चें टिन ९५ अथवा १८ B.W.G चें टिन ७२ ह्यांचें वजन एक टन असतें.

( ७ ). जिन्याच्या पायऱ्याचा चढाव सात इंचा पेक्षां ज्यास्त आणि साडे पांच इंचा पेक्षां कमी

नसावा. टप्पे बारा इंचा पेक्षां ज्यास्त आणि नऊ इंचा पेक्षां कमी नसावे. चढावाची आणि टप्प्याची बेरीज १८ असावी. म्हणजे बारा इंच टप्पा असल्यास सहा इंचाचा चढाव पाहिजे.

( ८ ). स्टोन=१४ पौंड; ग्रास=१२ डझन; रीम=२० दस्ते. दस्ता=२४ तांव( कागदाचें)

( ९ ). एक ग्यालन व्हारनिस मध्यें ३०० चौरस फूट काम होतें आणि दोन रोगणाचें हात होतात.

(१०). रेल्वेंत २७.२२ मण=टन.

(११). लोखंडी गर्डर मापानें कितीहि हिशेबांत येत असली तरी गर्डरची उंची स्प्यानच्या एक विसांश पाहिजे. म्हणजे २० फूट रुंदीच्या खोलींत गर्डर टाकावयाची असल्यास त्या गर्डरची उंची एक फूट पाहिजे.

(१२). कामाकरितां लागणारा सामान. शंभर घनफूट करितां. कांक्रीट,भराई १०० घनफूट गिट्टी आणि ३२ घनफूट पिसलेला चुना. टेबल

विटा ( ९"+४॥"+३" )च्या १४००. बाजारू विटा २००० आणि पिसलेला चुना ३० घनफूट.

(१३). शंभर घनफूट करितां लागणारा कोरडा चुना. (घनफूट). कांक्रीट १६, दगडी रबल काम १६, दगडी साधे रबल काम २०, टेबल विटांचें काम १२, बाजारू विटांचे काम १६.

(१४). शंभर चौरस फूट करितां लागणारा कोरडा चुना (घनफूट). चुन्याची फरसी काम १५, दरज बंदी काम १॥, चुन्याची छपाई ३, दगडी फरसी काम ८.

(१५). कोरड्या चुन्याची मापें जीं वर (१३) आणि (१४) मध्यें दिलेलीं आहेत त्यांचे दुप्पट करावें ह्मणजे तितका पिसलेला चुना त्या कामा करितां लागतो. ह्मणजे कांक्रीट करितां पिस लेला चुना ३२ घनफूट लागतो.

(१६). कोरडा चुना १ आणि रेति २ अगर कोरडा चुना १ रेति १ आणि सुरखी ( विटाची

भुकटी ) १ या हिशेबानें प्रमाण आहे. ही कोरडी भुकटी एकत्र करून आणि चक्कींत टाकून पिसली गेली ह्मणजे हा पिसलेला अथवा कमावलेला चुना कामाला लागतो. चुना चक्कींत पांच तास तरी चांगला पिसला गेला पाहिजे. चांगला पिसलेला चुना चिकट लागतो आणि त्याचा गोळा भिंतीवर फेकून मारला तर तो भिंतीला चिटकून बसतो अथवा पाण्यांत गोळा टाकला तर तो विरघळत नाहीं. चुना चक्कींत पिसतांना माफक पाणी मधून मधून टाकलें जातें.

(१७). कारागीराचें काम. ( घनफूट. ) एक कारागीर विटाचें काम २५, विटाच्या कमानीचें काम १६, सुताराचें लांकूड काम चौकट १॥. ( चौरसफूट ). फरसीचें काम २५, सुताराचें लांकूड काम दिला आणि कांचेचें दरवाजे व खिडक्या ४, साधे दरवाजे ७, छत लांकडी २०, कारागीराचे काम सफेती १०००,

चुन्याची छपाई ७०, दरजंबदी ७०, मातीची छपाई ३००; सफेती करितां १०० चौरस फूटाकरितां २ शेर चुना लागतो.

(१८). एक घनफूट तयारी लांकूड कामाकरितां दीड घन फूट मापाची मयाल लागते. मयाल जेवढी लांब असेल तिच्या मधोमध घेर मोजावा आणि घेराचा चौथा हिस्सा काढावा. नंतर त्याचा वर्ग करून त्याला लांबीनें गुणावें ह्मणजे मयालीचें घनफूट माप येतें. उदाहरणार्थः—सहा फूट मयालीच्या घेराचा चौथा हिस्सा दीड फूट आणि दीड फुटाचा वर्ग दीडाला दिडानेंच गुणून येतो ह्मणून नऊ चतुर्थांश वर्ग होतो आणि त्याला लांबीनें गुणिले ह्मणजे वीसफूट लांब मयाल असल्यास नऊचतुर्थांस गुणिले वीस मयालीचें माप ४५ घन फूट येतें. ( १॥×१॥×२०=४५ ).

(१९). एका साधारण बैल गाडींत खालील प्रमाणें माल भरतां येतो (घनफूट). गिट्ठी १२, मुरुम १२, रेति १२, चुना भुकटी २०, रबल दगड १०;

१२०० पौंडा पर्यंत वजनाचें सामान एका गाडींत भरण्यास हरकत नसते. गाडीचा आकार पाहून तें ठरविणें बरें असतें, कारण कांहीं ठिकाणीं गाड्या फारच लहान आकाराच्या असतात.

(२०). १६ ड्राम=औंस, १६ औंस=पौंड, २८ पौंड= क्वार्टर, ४ क्वार्टर्स=हंडरवेट, २० हंडरवेट= टन. २२४० पौंड=टन.

(२१). २० ग्रेन=स्क्रुपल, ३ स्क्रुपल्स=ड्राम, ८ ड्राम= औंस, १२ औंस=पौंड.

(२२). ८ पिंट=ग्यालन, २ ग्यालन=पेक, ४ पेक= बुशेल, ८ बुशल=क्वार्टर; १०। घनफूट= क्वार्टर, ६। घनफूट=ग्यालन.

(२३). १२ इंच=फूट, ३ फूट=यार्ड, ५॥ यार्ड=पोल, ४० पोल=फर्लांग, ८ फर्लांग=मैल; ५२८० फूट=१७६० यार्ड=मैल.

(२४). १४४ चौरस इंच=चौरसफूट, ९ चौरसफूट= चौरसयार्ड, ३०। चौरस यार्ड=पोल,

चुन्याची छपाई ७०, दरजंबदी ७०, मातीची छपाई ३००; सफेती करितां १०० चौरस फूटाकरितां २ शेर चुना लागतो.

(१८). एक घनफूट तयारी लांकूड कामाकरितां दीड घन फूट मापाची मयाल लागते. मयाल जेवढी लांब असेल तिच्या मधोमध घेर मोजावा आणि घेराचा चौथा हिस्सा काढावा. नंतर त्याचा वर्ग करून त्याला लांबीनें गुणावें ह्मणजे मयालीचें घनफूट माप येतें. उदाहरणार्थः—सहा फूट मयालीच्या घेराचा चौथा हिस्सा दीड फूट आणि दीड फुटाचा वर्ग दीडाला दिडानेंच गुणून येतो ह्मणून नऊ चतुर्थांश वर्ग होतो आणि त्याला लांबीनें गुणिले ह्मणजे वीसफूट लांब मयाल असल्यास नऊचतुर्थांस गुणिले वीस मयालीचें माप ४५ घन फूट येतें. ( १॥×१॥×२०=४५ ).

(१९). एका साधारण बैल गाडींत खालींल प्रमाणें माल भरतां येतो (घनफूट). गिट्टी १२, मुरुम १२, रेती १२, चुना भुकटी २०, खल दगड १०;

१२०० पौंडा पर्यंत वजनाचें सामान एका गाडींत भरण्यास हरकत नसते. गाडीचा आकार पाहून तें ठरविणें बरें असेंत, कारण कांहीं ठिकाणीं गाड्या फारच लहान आकाराच्या असतात.

(२०). १६ ड्राम=औंस, १६ औंस=पौंड, २८ पौंड=क्वार्टर, ४ क्वार्टर्स=हंडरवेट, २० हंडरवेट=टन. २२४० पौंड=टन.

(२१). २० ग्रेन=स्क्रुपल, ३ स्क्रुपल्स=ड्राम, ८ ड्राम=औंस, १२ औंस=पौंड.

(२२). ८ पिंट=ग्यालन, २ ग्यालन=पेक, ४ पेक=बुशेल, ८ बुशल=क्वार्टर; १०। घनफूट=क्वार्टर, ६। घनफूट=ग्यालन.

(२३). १२ इंच=फूट, ३ फूट=यार्ड, ५॥ यार्ड=पोल, ४० पोल=फर्लांग. ८ फर्लांग=मैल; ५२८० फूट=१७६० यार्ड=मैल.

(२४). १४४ चौरस इंच=चौरसफूट, ९ चौरसफूट=चौरसयार्ड, ३०। चौरस यार्ड=पोल,

४० पोल=रुड, ४ रुड=एकर; ४३५६० चौरसफूट=एकर.

(२५). चौरस मैल=६४० एकर=३०९७६०० चौरसयार्ड=२७८७८४०० चौरसफूट.

(२६). १०० लिंक्स=६६फूट=चेन, ८० चेन्स=मैल, १० चौरसचेन्स=एकर; १००००० चौरस लिंक्स=एकर.

(२७). घनफूट=६२.४२५ पौंड=६·२४ ग्यालन. १० पौंड=ग्यालन=·१६ घनफूट.

(२८). ८ पायल्या=कुडव, २० कुडव=खंडी. १। शेर वजनी=पायली=१००तोळे(१००रुपये भार)

(२९). ५ तोळे=छटाक, १६ छटाक=शेर, ४० शेर=मण, २७। मण=टन. १ रुपया भार ह्मणजे १ तोळा=११॥। मासे.

(३०). २ गुंजा=वाल, ४ वाल=मासा, १२ मासे=तोळा. सोने आणि चांदी मोजण्या करितां.

(३१). पौंड=३९ रुपये भार; शेर=८० रुपये भार;

(३२). भाजीपाला आणि मिरच्या वगैरे मोजण्या करितां १ शेर ४ छटाक=पासरी.

(३३) साखर मोजण्याकरितां:- १शेर ९॥ छटाक =पासरी, २ पासऱ्या=धडा, ४ धडे =मण; १२॥। शेर =मण; १२८ शेर २ छटाक=खंडी,

(३४) गूळ मोजण्या करितां:– १ शेर १० छटाक= पासरी, २ पासऱ्या=धडा, ४ धडे=मण; १३शेर=मण,

(३५) खालील सामान मोजण्याकरितां एक मण किती शेराचा असतो हें दिलेलें आहे:- राजगिरा, खसखस, दाणे, चारोळी, सोप आणि सहद १३ शेर; सिकेकाई, काजू, किसमीस, आणि मेवा १० शेर; लवंगा, सुपारी, वेळदाणा, वेलदोडे, मिरे, खारका, बदाम, खोबरें हळद आणि गुलाल १०शेर१०छटाक; जीरे ११शेर ४ छटाक; काथ, तूप आणि सुंठ१२ शेर; खोबऱ्याचें तेल ४० शेर; हळद वायगांव १०; शेंदूरजनी हळद १०शेर १० छटाक.

(३६) हिंग आणि पिपरमिंट मोजण्याकरितां:—

३९ रुपये=रतल; २ रतल=शेर.

(३७). कापड मोजण्याचें माप:— १६ गीरे = ३६ इंच = वार; १८ इंच = हात

(३८). टपालासंबंधी माहिती:- पोष्ट कार्ड अर्धा आणा, रिप्लायकार्ड एक आणा, पत्रें:— अडीच तोळ्यापर्यंत एक आणा, पुढें प्रत्येक अडीच तोळ्यास किंवा त्याचे भागास एक आणा. बुक पोष्ट:— पांच तोळ्यापर्यंत अर्धा आणा, पुढें प्रत्येक पांच तोळ्यास अथवा त्याचें भागास अर्धा आणा. पार्सल:— वीस तोळ्यापर्यंत दोन आणे; वीस ते चाळीस तोळ्यास तीन आणे; पुढें प्रत्येक चाळीस तोळ्यास तीन आणे, ४४० तोळ्यापासून ४८० तोळ्यापर्यंत तीन रुपये; पुढें प्रत्येक ४० तोळ्यास ८०० तोळ्यापर्यंत चार आणे. रजिस्ट्रेशन फी दोन आणे; इन्शुअरन्स फी प्रत्येक पन्नास रुपयाला अगर त्याच्या भागाला एक आणा.

(३९). मनिऑर्डरचे दर:—१० रुपयापर्यंत दोन

आणे; २५ रुपयापर्यंत चार आणे; पुढें प्रत्येक २५ रुपयास चार आणे; आणि १० रुपयापर्यंत दोन आणे, ६०० रुपयापेक्षां ज्यास्त मनिआर्डरनें पाठवितां येत नाहींत.

(४०). तारः- जरूर (Express) १२ शद्बा पर्यंत दीड रुपया आणि पुढें प्रत्येक शद्बास दोन आणे. साधारण (ordinary) १२ शद्बापर्यंत बारा आणे आणि पुढें प्रत्येक शद्बास एक आणा.

(४१). उतार जागेंतून जें पाणी वाहतें तें पाणि ज्या उंच जागे वरून वाहत येतें त्या जागेची मोजणी करून त्याचें क्षेत्रफळ एक एकर जर असेल तर त्या जागेवरून दीड घनफूट एका सेकंडला या प्रमाणानें पाण्याचा प्रवाह असतो. एकमैल क्षेत्रफळा पर्यंत दीडीचें प्रमाण असतें. म्हणजे एक मैल क्षेत्रफळ असल्यास ९६० घन फूट एक सेकंडला पाण्याचा प्रवाह असतो.

एक मैलाच्या वर क्षेत्रफळ असल्यास त्याला तिनदां गुणून म्हणजे त्याचा घन करून जें येईल त्याचा चतुर्थमूल काढून १००० नें गुणिले म्हणजे तितका घनफूट पाण्याचा प्रवाह त्या जागेवरून वाहतो. म्हणजे क्षेत्रफळ ४ मैल असल्यास ४ चा घन ६४ येतो. त्याचा चतुर्थमूल २.८३ येतो आणि त्याला १००० नें गुणिले म्हणजे २८३० घनफूट पाणी त्या जागेवरून वाहतें असें हिशेबानें येतें.

पाणी ज्या उतारावरून वाहत जातें त्या ठिकाणीं पाण्याचा वेग उतारावर अवलंबून असतो. पाण्याचा वेग एक सेंकंडला ६ फूट असेल आणि पाणी वाहण्याकरितां पुढें अडथळा असेल तरच जमीनीवर असलेली काळी माति वाहून जाते, ८ फूट वेग असेल तरच कठिण माति वाहते आणि जमीनीवर विटाचें काम केलेलें असेल तर १० फूट वेग आणि दगडाचें काम असेल तर

१२ फूटापर्यंत वेग चालूं शकतो. ह्यापेक्षां कमी वेग असल्यास आणि पुढें अडथळा नसल्यास पाण्याला जमीनीवर असलेली माति वाहवितां येत नाहीं. म्हणूनच ज्या ठिकाणीं पाण्याचें प्रवाह वाहतात त्या ठिकाणीं प्रवाहाच्या तीराची उंची जेथें प्रवाहाच्या सपाटीपेक्षां ज्यास्त असेल त्या ठिकाणीं ते प्रवाह कृत्रीम आहेत असें सिद्ध होतें. दऱ्या खोऱ्यांतून फक्त वाहणारें प्रवाह नैसर्गिक आहेत. परंतु जेथें जमीन आसपास सपाट असून अथवा पहाड फोडून पाण्याचा प्रवाह वाहत असताना दिसतो त्या ठिकाणीं कृत्रीमपणा असतो. त्याच कारणामुळें जब्बलपूर जवळ असलेल्या भेडा-घाटीं नर्मदेचा प्रवाह कृत्रीम आहे ह्मणूनच त्याठिकाणीं मोठा धबधबा आणि डोहहि आहेच आणि त्या प्रवाहाला नर्मदामाईच्या योगानें महत्वहि आलेलेंच आहे. अशाप्र-कारें ज्या ठिकाणीं कृत्रीमपणा आहे त्या

ठिकाणीं ज्यांनीं ते प्रवाह वाहविले आहेत त्यांच्या नांवानें ते प्रवाह वाहत असून वाह-विणाऱ्यांचीं नांवें अजरामर झालेलीं आहेत आणि त्यांच्या पुण्याईनें त्या प्रवाहांना पावि-त्र्यहि आलेलें आहे. पृथ्वीवर असेलल्या उंच जमीनींत जातवार थर असणें नैसर्गिक आहे आणि अशा ठिकाणीं विहीरींत पाण्याचें झरे-हि लागतात. परंतु ज्या ठिकाणीं भेंसळ दगडभाति वगैरे आढळतात त्या ठिकाणीं कृत्रीमपणा असल्यामुळें तेथें विहीरींत झरेहि लागणें शक्य नसतें. ह्मणून पाण्याचे प्रवाह कोठें नैसर्गिक आहेत आणि कोठें कृत्रिम आहेत हें समजणें जसें कठीण नाहीं त्याच प्रमाणें पृथ्वीवर असलेले पहाड आणि पर्वत कोणते नैसर्गिक आहेत आणि कोणते कृत्रीम आहेत हेंहि समजणें कठीण नाहीं. पृथ्वीवर जें पाणी आहे त्यापैकीं ६ फुट ऊंच पाण्याला एक वर्षात जमीन आणि हवा शोसून घेतें. हवा पाण्याला शोसून घेत अस-

त्यामुळें जेथें पाणी असेल त्या ठिकाणीं जवळपास हवा थंड असते. पीठानें शोसून घेतलेलें पाणी जसें पुन्हां पीठांतून सर्वचें सर्व निघू शकत नाहीं त्याचप्रमाणें हवेनें शोसून घेतलेलें पाणी आणि जमीनींत मुरलेलें पाणी पुन्हां सर्वचें सर्व वेगळें होऊं शकत नाहीं. म्हणून हवेनें शोसून घेतलेल्या खाऱ्या पाण्याशीं पावसाळ्यांत पडणाऱ्या गोड्या पाण्याचा संबंध नाहीं.

(४२). पृथ्वीसारखी पृथ्वि एकच आहे आणि पंचतत्वापैकीं तें एक तत्व असल्यामुळें पृथ्वीवरच जिवांना स्वर्गसुख आणि नर्कवास भोगावा लागतो आणि म्हणूनच जिवांवर ज्या शक्तींचा परिणाम होतो ती ज्यांची शक्ति आहे ते नऊ ग्रह आहेत. जे जिव जसें कर्म करतात त्या कर्मानुरुपच त्या जिवांवर ग्रहांचाहि परिणाम होतो. पूर्व कर्मानुरुप ग्रहांचा परिणाम जिवावर होत असला तरी चालू स्थीतींत कर्मानें ते ग्रह हटतात. गृहस्थाश्रमांत जर एखाद्या

२४६५



एम. ए. झालेल्या विद्वानाकडून वाईट कर्में झालीं तर त्याची पूर्वाश्रमांतलि विद्या जशी व्यर्थ जाते अथवा पूर्वाश्रमांत उडाणटप्पू असले-ल्यानें जर गृहस्थाश्रमांत चांगलीं कर्में केलीं तर त्याचा पूर्वाश्रमीचा कलंक जसा नाहीसा होतो त्याचप्रमाणें पूर्व जन्मीच्या कर्मानुरुप मागे लागलेल्या ग्रहापासून होणारे परिणाम चालू जन्मांत कर्मानें हटतात आणि हटविलें जातात.

(४३). राक्षसाची एक निराळीच जात नसून सर्व जातींत राक्षसगणाचें जसे लोक आहेत तसेच देवगणाचे आणि मनुष्यगणाचेहि लोक आहेत.

(४४). चांगलीं कर्में आणि मोठमोठालीं कर्में ज्यांच्या-कडून घडतात त्यांचे तारे चमकतात. म्हणून नऊ ग्रहांचें तेज पडतें. ध्रुवाचा तारा चमक-तो. एखादा सार्वभौम राजा मृत्यू पा[illegible]वतो तेव्हां तारा तुटतो म्हणून जिवांचा ता[illegible]ऱ्यांशीं असलेला संबंध समजतो.

REFBK-0002465

कृत्रीमधर्मातील मंडळी जन्मसिद्ध हक्काची जाणीव ठेवून आणि स्वधर्माची ओळख ठेवून आपापल्या पायरी प्रमाणें आणि धर्मात असलेल्या रिवाजाप्रमाणें निर्मळ अंतःकरणानें जी मूर्तिपूजा करतात ती ईश्वरालाच पोंचल्या शिवाय राहत नाहीं. अशा रितीनें ज्यांना मूर्तिपूजा घडते ते कोणत्याहि धर्माचे असले तरी त्यांच्यांत भांडणें नसतात इतकेंच नाहीं तर त्यांना स्वधर्माची जाणीव असल्यामुळें ते एक मेकांचा आदर ठेवितात आणि ज्यांचें आचरण जसें ज्यास्त असतें त्यांना त्यामानानेंच मान मिळतोहि. ज्यांना भांडणेंच करावयाचीं असतात त्यांची मात्र गोष्ट अगदीं वेगळी असते. कारण त्यांना भांडणें उकरून काढण्यास वाटतील तीं कारणें सांगतां येतात. ही दुतोंडी शेषाची परम्परा विषारी असल्यामुळें त्यांचें उलट सुलट बोलणें हेंच ध्येय असतें आणि रागावणें तर नाकावर ठेवलेलें असल्यामुळें त्यांची नेहमी तमोगुणी वृत्ती होते आणि अशा मंडळींना कोणतीहि गोष्ट पटणें त्यांच्या मनावर अवलंबून असल्यामुळें त्यांच्याशीं बोलणें सुद्धां कठिण जाते. मग त्यांना पटवून देणें तर लांबच राहिलें! प्रत्यक्ष जें दिसतें तें त्यांना दाखविलें तरी जें

दिसतें तें खरें नसतें असें म्हणून, पटत नाहीं असें म्हणणें त्यांचें ठरलेलेंच असतें आणि ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाहीं म्हणून त्याचें अस्तित्व पटत नाहीं असेंहि म्हण-ण्याची त्यांची तयारी असेत. असें जरी असलें तरी मूर्ति पूजा सर्वांना मान्य आहे यांत संशय नाहीं आणि जों पर्यंत मनुष्य ही मूर्ति आहे आणि सन्मान करणें पुजेची पाहिली पायरी आहे तों पर्यंत मुळींच जगांत मूर्तिपूजा नाहीं असें कोणालाहि म्हणतां येणें शक्य नाहीं. दगडा-ची मूर्ति करून जे पुजा करतात तेथें दगडाला महत्व नसून दगडाच्या टिकाऊपणाला महत्व आहे. दगडा पेक्षां ज्यास्त टिकाऊपणा ज्यांनां पाहिजे असतो ते धातूची मूर्ति करतात आणि श्रीमंत हिऱ्यामाणकाच्याहि मूर्ति करतात म्हणून किंमत नसलेल्या अशा मातीच्या लिंगाची पूजा कमी योग्यतेची असेत असें होत नाहीं. हिंदुस्थानांत निरनिराळें प्रकार नैसर्गिक असल्यामुळें पूजेमध्यें सुद्धां निरनिराळे प्रकार जरी आहेत तरी ते सारख्याच महत्वाचे आहेत आणि कृत्रीम धर्मांतहि हिंदुस्थानांत त्याला मान्यता दिलेली असल्यामुळेंच त्य धर्मांतील लोकांकडून त्यांनाहि पूज्य असलेल्या